अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १६ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ९८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## मी कुणाला खूश करायला निकाल दिला नाही; राहुल नार्वेकर

**मुंबई** : मी कुणाला संतुष्ट करायला निकाल दिला नाही, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसारच निकाल दिला. भारतातील कोणत्याही नागरिकाला न्यायालयात जाण्याची मुभा आहे, अशी प्रतिक्रिया विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली.

विधानसभा अध्यक्षांच्या निकालानंतर ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात निकालाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आलीये. त्यावर आता राहुल नार्वेकरांची प्रतिक्रिया समोर आलीये. याचिका गेली म्हणजे निकाल चुकीचा आहे असं म्हणता येणार नाही, निकालात काय चुकीचं आहे हे न्यायालयाने दाखवून द्यावं लागेल, असं देखील राहुल नार्वेकर यांनी म्हटलं.



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी १० जानेवारी रोजी शिवसेनेच्या आमदार अपात्रतेच्या याचिकेवरील आपला निकाल दिला. त्यामध्ये त्यांनी बहुमताच्या आधारे शिवसेना ही शिंदे गटाची असल्याचं सांगितलं. तर शिंदे गटाचे व्हिप भरत गोगावले यांचीच नियुक्ती योग्य असल्याचं सांगत ठाकरे गटाचे व्हिप सुनील प्रभू यांची निवड अवैध ठरवली. तसेच त्यांनी आमदार अपात्रतेच्या दोन्ही गटाकडून आलेल्या याचिका फेटाळल्या आणि कुणालाही अपात्र ठरवलं नाही.

# भावनिक साद घालत मालकांनी रणशिंग फुंकले




# गणपतआबांच्या नातवांना शहाजीबापूंनी ललकारले

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**सोलापूर जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार तसेच त्यांच्या विरोधातील माजी आमदार यांच्याकडून आगामी निवडणूक लढवण्यासाठी जोरदार तयारी सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.कोण रणशिंग फुंकत आहे तर कोण समोरच्याला ललकार देत आहे. रविवारी जिल्ह्याच्यास्तरावर महायुतीचा मेळावा झाला.त्यात भाजपच्या मित्र पक्षांची धुसपूस बघायला मिळाली. महायुतीमध्ये एकवाक्यता, एकी दिसत आहे पण महाविकास आघाडीची कुठलीच तयारी दिसत नाही. आघाडीतील कार्यकर्ते जागा वाटपाची प्रतिक्षा करत आहेत.आताच जागा वाटत जाहीर केल्यास पुढील रणनीती ठरवणे आणि काम करायला सोपे होईल,असे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे पण आघाडीतील नेत्यांचे सोलापूरच्याबाबतीत डोळेझाक होत असल्याची खंत व्यक्त होते आहे.महायुतीकडून मात्र निवडणुकीच्या प्रचाराची साखर पेरणी सुरू झाली आहे.**

दक्षिण सोलापूर मतदार संघात काँग्रेस आणि भाजप यांच्यात सरळ लढत होणार आहे. भाजपकडून विद्यमान आ.सुभाषबापू देशमुख यांनी तर केव्हापासून शड्डू ठोकत मतदार संघ पिंजून काढत आहेत.त्यांना फाईट देण्यासाठी काँग्रेसकडून अजूनही चेहरा समोर आणला गेला नाही तरी देखील झेडपीचे माजी सभापती सुरेश हसापुरे आणि माजी आमदार दिलीप(मालक) माने यांची नावे पुढे येतायेत.

माने यांनी फेसबुक पोस्टवरून कार्यकर्त्यांसाठी एक भावनिक पोस्ट टाकली आहे. त्यात त्यांनी व्यक्त केलेल्या भावना पाहाता जणू त्यांनी दक्षिणसाठी रणशिंग फुंकल्याचे मानले जात आहे. माने म्हणतात की, संघर्षाला घाबरतेय कोण? जो निर्णय घेईन, तो सर्वांच्या हिताचा असेल. माझा कोणताही निर्णय तुम्हा सर्वांना विश्वासात घेऊनच होईल. गेल्या काही दिवसांपासून शांत असलेले माने यांनी मला तुमच्याशी बोलायचे आहे,असे म्हणत कार्यकर्त्यांशी संवाद साधला आहे. माने यांनी मागील निवडणूक सोलापूर शहर मध्य मतदारसंघातून शिवसेनेच्या तिकिटावर लढवली होती. मात्र, त्यात त्यांना अपयश आले होते. त्यानंतर ते शिवसेनेपासून चार हात लांब आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळ गेले होते. थेट अजित पवार आणि शरद पवार यांच्याशी त्यांचा संपर्क होता. मात्र, राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर त्यांनी काहींशी तटस्थ भूमिका घेतल्याचे दिसून येत होते. मात्र, काही दिवसांपूर्वी त्यांनी आपण दक्षिण सोलापूर मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, पक्ष कोणता हे सांगितले नव्हते. आताही त्यांची तीच भूमिका दिसत आहे. निवडणुकीत संघर्ष करण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे. मात्र, तो संघर्ष कोणत्या पक्षाच्या माध्यमातून उभारणार हे स्पष्ट केले नाही. तसेही माने यांच्यासमोर मोजकेच पर्याय आहेत. कारण दक्षिण सोलापूरमधून भाजपचे सुभाष देशमुख आमदार आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये हा मतदारसंघ भाजपला सुटणार हे निश्चित आहे. महाविकास आघाडीत मागील वेळी तो काँग्रेसकडे होता. मात्र, काँग्रेस नेत्यांशी त्यांचे किती सूत जुळते यावरच त्यांच्या उमेदवारीचे भवितव्य अवलंबून असणार आहे. वाट आहे संघर्षाची...मग संघर्षाला घाबरतंय कोण? लढणं आणि जिंकणं हे तर रक्तातच...!



### लढाई लढणार आणि जिंकणारही

आजही मी रणांगणातच आहे. माझ्या मनात किंचितही अहंकार नाही, वा गर्वही नाही. सामान्य जनतेची साथ, हाच माझा विश्वास आणि ही साथ कायमची हवी आहे. तुम्हाला काळजी करायचे कारण नाही; कारण तुमच्या पाठीशी मी सदैव उभा आहे. तुम्ही सर्वजण एकजुटीने पाठिशी असल्याने मी लढाई लढणार व जिंकणारच...तुमच्या जीवाभावाचा, आपल्यातला माणूस, स्वाभिमान जागृत करणारा, 'लोकप्रतिनिधी' तुम्ही निर्माण केला. 'आमदार' म्हणून पाहिलाय. या काळात मी जोडलेले आपण सर्व लोक सदैव माझ्यासोबत आहात, याचा सार्थ अभिमान आहे.

सांगोला मतदार संघात शेतकरी कामगार पक्ष व महायुती यांच्यात कडवी झुंज होणार आहे. शिंदे गटाचे विद्यमान आमदार शहाजीबापू पाटील हे बाह्या सरसावून तयार आहेत तर त्यांना टक्कर देण्यासाठी दिवंगत माजी आमदार गणपतराव देशमुख यांचे दोघे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख आणि डॉ.अनिकेत देशमुख हे मैदानात उतरले आहेत.तेव्हा शहाजीबापूंनी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून दोनही नातवांना ललकारले आहे.

सांगोला तालुक्याला १.६०० टीएमसी पाणी नव्याने मंजूर केल्याबद्दल वाटंबरे ग्रामस्थांच्या वतीने शहाजीबापू आणि माजी आमदार दीपक साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला.त्यावेळी शहाजीबापूंनी दोनही नातवांवर निशाणा साधला.

टेंभूचे पाणी सांगोला तालुक्यातील माण नदीत आल्यामुळे माझे स्वप्न साकार झाले आहे. टेंभूच्या पाण्यामुळे माण नदीकाठावरील शेतकऱ्यांसाठी सोनियाचा दिवस उगवला आहे. पण, आमचे विरोधक आजही गणिते मांडत आहेत. गणित समजून घ्यायचे असेल तर माझ्याकडे या. तुमच्या आजोबाला जे जमले नाही, ते तुम्हाला कुठे जमायचे. नादाला लागू नका, आमचे आम्ही गणित करतो, अशा शब्दांत शहाजीबापूंनी बाबासाहेब देखमुख आणि शेकापला आव्हान दिले. मी दीपक साळुंखेंचे शंभर वेळा आभार मानतो. त्यांच्या पाठिंब्यामुळेच मी आमदार झाल्याने सांगोला तालुक्यासाठी पाणी आणू शकलो आहे. तालुक्याचा दुष्काळ हटण्यास मदत झाली आहे, अशी कबुलीहीपाटील यांनी दिली.

पाटील म्हणाले, की सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाण्यासाठी चळवळ उभी करून आम्ही संघर्ष केला. विविध पातळ्यांवर आंदोलनं केली. अगदी जनावरे घेऊन उपोषणं केली. त्यामुळे आज कुठेतरी टेंभूचे पाणी सांगोला तालुक्याला मिळायला लागले आहे.

माण नदीवरील सर्व १६ बंधारे वर्षातून तीन वेळा भरण्यात येणार आहेत. तसेच वंचित १९ गावांनाही आता पाणी मिळणार आहे. शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या सांगोला विधानसभा मतदार संघात शिवसेनेचा भगवा २०१९मध्ये प्रथमच फडकला आहे. शेकापचे आ.गणपतराव देशमुख यांचे नातू अनिकेत देशमुख यांचा शिवसेनेचे उमेदवार शहाजीबापू यांनी अवघ्या ६७४ मतांनी पराभव केला. यावेळेस बाबासाहेब आणि अनिकेत हे दोघेही इच्छुक आहेत मात्र शेकापचे हायकमांड आणि सांगोल्यातील कार्यकर्ते दोघांपैकी ज्याची निवड करतील,त्यानेच निवडणूक लढवावी, असे ठरले आहे.त्यानुसार उमेवारीची माळ कोणाच्या गळ्यात पडते यावरच बापूंचा प्रतिस्पर्धी असणार आहे.



### 'माण'चा तळ दिसू देणार नाही

सांगोल्याला आता पाण्यासाठी संघर्ष करण्याची गरज नाही. आपल्या हक्काचं पाणी तालुक्याला मिळणारच आहे. तुम्ही कोणतीही काळजी करू नका. माण नदीचा तळ तुम्हाला दिसू देणार नाही, असा शब्द मी आणि दीपक साळुंखे देतो, असेही शहाजी पाटील यांनी स्पष्ट केले.

## सोलार प्लांटमधून १० लाखांचे साहित्य पळविले

### दोघांना अटक; तिघे पसार

**सुराज्य/सोलापूर**

सोलर पॉवर प्रोजेक्ट मध्ये प्रवेश करून १० लाख रुपये किमतीचे साहित्य चोरून पळून जाताना प्रोजेक्टच्या डायरेक्टरने दोघा चोरट्यांना रंगेहात पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले .तर अन्य तिघेजण बोलोरे मधून पसार झाले. ही घटना पोखरापूर (ता.लुका) मोहोळ येथील बी.आर. दळवे पाटील सोलर प्लांट येथे रविवारी घडली.

किसन दशरथ सपकाळ आणि सिद्धेश्वर गोवर्धन गिड्डे (दोघे रा. गिड्डेवाडी ता. मोहोळ) अशी अटकेतील चोरट्यांची नावे आहेत. त्यांना मोहोळच्या न्यायालयाने २ दिवस पोलीस कोठडी ठेवण्याचा आदेश आज सोमवारी दिला. अन्य तिघेजण पसार असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. यासंदर्भात पोखरापूर येथील सोलार प्लांट चे डायरेक्टर बाबासाहेब रामकृष्ण दळवे (रा.पोखरापूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. काल रात्री एक वाजेच्या सुमारास त्यांच्या प्रोजेक्ट वरील गार्ड जयराम वाघमोडे यांनी आपल्या प्लांटमध्ये काही तरुण घुसून कटरने अल्युमिनियमच्या तारा तोडून वाहनात भरत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे बाबासाहेब दळवे यांनी घटनास्थळी घेऊन पाहणी केली. आणि पाठलाग करून दोघांना पकडले. तर अन्य तिघेजण चोरीचे साहित्य घेऊन बोलेरो जिप मधून पसार झाले. त्यानंतर दळवे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास हवालदार भोसले करीत आहेत.

## मकर संक्रांतनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी गाभाऱ्याला तीळ-फुलांची सजावट

**सुराज्य/पंढरपूर**

मकर संक्रांतीनिमित्त सोमवारी पहाटेपासून सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात गर्दी झाली होती. त्यामुळे मंदिर परिसर महिला भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्याचे दिसून आले. यामध्ये सौभाग्याचे लेणं समजला जाणारा लाखेचा चुडा भरण्यासाठीही महिलांची गर्दी झाली होती. तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या गाभाऱ्याला तीळ आणि फुलांची नयनरम्य सजावट करण्यात आली होती.



मकर संक्रांतीनिमित्त विठ्ठल मंदिरातील रुक्मिणीमाता, महालक्ष्मी मंदिरात सुवासिनी महिलांची वाणवसा घेण्यासाठी भल्या पहाटेपासून गर्दी झाली होती. यावेळी महिला हळदी-कुंकू, बोरं, उसाच्या लहान कांड्या, ढाळा, तिळगूळ, संक्रांतीचे सुगड घेऊन वाणवसा करून परंपरेप्रमाणे एकमेकींच्या डोक्यावर तीळ टाकून, हातावर तिळगूळ देऊन सणाचा आनंद लुटत होत्या. तसेच शहरातील सुवासिनी महिला दिंडीर वनातील लखुबाई, एकविरामाता, हरिदासाची देवी, अंबाबाई, पद्मावती, यमाईतुकाई, आदी मंदिरांमधून वाणवसा करीत असल्याचे दिसत होते. याबरोबरच उपनगरातील महिला त्या त्या भागातील मंदिरामधून एकमेकींना हळदी-कुंकू लावून संक्रांतीचा सण उत्साहात साजरा करीत होत्या.

विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासह चंद्रभागा वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग आणि स्टेशन रोडवरही महिलांच्या वाणवसा घेण्यासाठी अगदी झुंडी येताना दिसत होत्या. विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी गोपाळपूर रस्त्यावरील पत्राशेडपर्यंत दर्शन रांग पोहोचलेली दिसत होती. संक्रांत सणानिमित्त विठ्ठल मंदिरात वेगवेगळया फळा, फुलांबरोबरच सुवासिनी महिलांकडून केल्या जाणाऱ्या वाणवशयामध्ये समावेश असलेल्या भाजीपाल्यांची आकर्षक सजावट केल्याचे दिसत होते.

यामध्ये ज्वारीचे कणीस, हरभऱ्याचा ढाळा, दाणेदार ज्वारीचा हुरडा, ऊस, गाजर, बोरं, शिमला मिरची, आदींचा समावेश होता.

## आष्टी येथील गोळीबार प्रकरणी तीन संशयित ताब्यात

**पंढरपूर** : शेटफळ रस्त्यावर १३ जानेवारीच्या रात्री घडलेल्या गोळीबाराच्या घटनेने सोलापूर जिल्हा चांगलाच हादरून गेला आहे. हा प्रकार कौटुंबिक वादातून झाला असल्याची शक्यता पुढे आली आहे.

पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोली येथील सिध्देश्वर ब्रह्मदेव नाईकनवरे आणि त्यांचा नातेवाईक आदित्य व्यवहारे हे आपल्या दुचाकीवरून घराकडे निघालेले असताना, पंढरपूर-शेटफळ रस्त्यावर, दुचाकीवरून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला होता. शेटफळ रस्त्यावर आष्टी गावाच्या हद्दीत ही घटना घडली होती. क्रमांक नसलेल्या एका दुचाकीवरून तिघ आले आणि नाईकनवरे यांची मोटार सायकल अडवली. अज्ञात तिघांपैकी एकाने, त्याच्याजवळ असलेल्या बंदुकीने गोळीबार केला पण त्यांचा प्रयत्न अयशस्वी झाला होता. २५ ते ३० वयोगटातील अज्ञात हल्लेखोर आपल्यावर हल्ला करीत असल्याचे दिसताच, नाईकनवरे आणि व्यवहारे हे जवळच असलेल्या उसाच्या पिकात पळून गेले. हा प्रकार सुरु असतानाच रस्त्यावरून अन्य वाहने तेथे येऊ लागल्याने, या अज्ञात तीन हल्लेखोरांनी आपली मोटार सायकल घेवून तेथून पळ काढला होता. या प्रकरणी मोहोळ पोलिसांनी तपासाची पुढील चक्रे गतीने फिरवली आहेत आणि संशयावरून तिघांना ताब्यात देखील घेतले आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून दोन जिवंत काडतुसे हस्तगत केली आहेत तसेच सीसीटीव्ही फुटेज व अन्य काही धागेदोरे मिळतात का ते पोलिसांचे तपासण्याचे काम सुरू आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




मुंग्यांना पण मोबाईल मधील तिळगुळाच्या फोटोची भुरळ पडलीय, इमेज काढून टाकतो!

कल्याण
449-75-339

मुंबई
789-45-267

# नार्वेकरांच्या निर्णयाविरूद्ध ठाकरे कोर्टात

**सुराज्य/मुंबई**

**शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरे आणि शिंदे अशा दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवले, परंतु खरी शिवसेना म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील पक्षाला मान्यता दिली. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहे. उद्धव ठाकरे यांनी नार्वेकरांच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निकालामुळे सुप्रीम कोर्टाचा अवमान झाल्याचे ठाकरे गटाने ऑनलाईन दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने मे २०२३ मध्ये शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवलं होतं. मर्यादित कालावधीत याबाबत निकाल देण्याचे आदेशही दिले होते. मात्र ही सुनावणी अखंडित होऊ शकली नाही.



सुनावणी वेगवान व्हावी आणि लवकर निकाल लागावा, यासाठी ठाकरे गटाने त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. दोन्ही गटांचे युक्तिवाद ऐकून ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागणे अपेक्षित होते. परंतु, राहुल नार्वेकरांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला आणि अखेर दहा जानेवारीला निकालाचे वाचन केले.


राहुल नार्वेकरांनी २०१९ मधील शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवत उद्धव ठाकरेंचं पक्षप्रमुख पदच अमान्य केलं. तसंच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचा निकाल दिला. शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवलेच, परंतु ठाकरे गटाच्याही १४ आमदारांना पात्र करण्यात आले, हा आश्चर्याचा धक्का मानला गेला.

विधानसभा अध्यक्षांच्या निकालातून न्याय मिळाला असल्याचे वाटत नसल्यास याचिकाकर्ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतात, असे कोर्टानेच नार्वेकरांकडे जबाबदारी सोपवताना सांगितले होते. त्यानुसार, उद्धव ठाकरे गटाने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाची दारे ठोठावली आहेत.

## उसाच्या ट्रॅक्टरखाली सापडून ईश्वर वठारमध्ये युवक ठार

**सुराज्य/पंढरपूर**

ऊस वाहतूक करणा-या एका ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून एका २१ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला. अमरजीत श्रीधर शिंगाडे (वय २१, रा, ईश्वरवठार, ता. पंढरपूर) असे अपघातात मरण पावलेल्या युवकाचे नाव असून रविवार, १४ जानेवारी सकाळी दहाच्या सुमारास हा अपघात झाला.



ईश्वरवठार परिसरात सध्या ऊसतोड सुरू आहे. परिसरात नागटिळक यांच्या शेतात सध्या ऊस तोडणी सुरु आहे. येथून ऊस घेऊन निघालेल्या ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून अमरजीत शिंगाडे हा गंभीर जखमी झाला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला.

=अमरजीत हा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अपघाती मृत्यूची वार्ता गावात वा-यासारखी पसरली.

ईश्वरवठार परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्याच्या पश्चात आई-वडील, एक बहीण असा परिवार आहे. एकुलता एक व शांत स्वाभावचा म्हणून त्याची ओळख होती. या आपघाताची नोंद पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात झाली असून पुढील प्राथमिक तपास पोलिस नाईक नितीन माळी हे करीत आहेत.

# एकी राहिली तर...

प्रभू रामचंद्र यांच्या लाटेमुळे काँग्रेसमध्ये कमालीची चिंता व्यक्त होते आहे. भाजपा नेते लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा काढल्यानंतर रामाची लाट कशी तयार झाली होती. त्या भाजपेतर पक्षाचा पालापाचोळा कसा झाला? हे देशाने पाहिले आहे. लोकसभा निवडणुकीच्याच तोंडावर भाजपने ही शक्कल लढवल्याने विरोधकांनी स्थापन केलेल्या 'इंडिया' या आघाडीतील नेतेही काळजीत आ-हेत.त्यातच इंडियामध्ये कुठल्याच विषयांवर एकमत होत नाहीय. शिवाय काँग्रेसमधील एकेक नेते पक्षालाच 'हात' दाखवत दुसऱ्या पक्षाच्या आश्रयाला जात आहेत. भाजपने हा 'चारसौ पार'चा नारा देण्यामागे दोन प्रमुख कारणे दिसतात. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची संधी २०२४च्या लोकसभा निवडणुकीतून मिळू शकेल असे पंतप्रधान नरेंद्र मोदींना वाटत असावे. पंडित नेहरूंनी सलग तीन वेळा (१९५१,१९५७ आणि १९६२) लोकसभेची निवडणूक जिंकली होती. मोदींनी सलग दोन वेळा २०१४ व २०१९ मध्ये लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला आहे. आता तिसऱ्यांदा जिंकून एकाच वेळी दोन विक्रमांची बरोबरी करू शकतो असेही वाटत असावे. दुसरा विक्रम म्हणजे १९८४ मध्ये राजीव गांधींनी लोकसभेमध्ये ४१४ जागा जिंकल्या होत्या. मोदींना यावेळी चारशेहून जास्त जागा जिंकायच्या आहेत. मैलाचा दगड ठरणाऱ्या दोन महत्त्वाकांक्षा एकाच वेळी पूर्ण करायच्या असतील तर कुठल्या ना कुठल्या स्वरूपाची लाट निर्माण करावीच लागेल. ही लाट नसेल तर 'चारसौ पार'चा आकडा कसा गाठणार, हा प्रश्न असेल. भाजपच्या राम मंदिराच्या राजकारणाचे हे अगदी थेट समीकरण आहे. भाजप निर्माण करू पहात असलेल्या या लाटेमध्ये विरोधकांची 'इंडिया' महाआघाडी वाहून जाणार की, अजूनही भाजपेतर पक्षांना आगामी लोकसभा निवडणुकीत तगड्या लढतीची आशा आहे? आत्ता 'इंडिया'मध्ये आलबेल नसल्याचे चित्र दिसत असल्याने हा प्रश्न कदाचित विचारला जाऊ शकतो. 'इंडिया'च्या शनिवारी झालेल्या बैठकीला तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव आणि शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित राहिले नसल्यामुळे विरोधकांच्या ऐक्याचे काही खरे नाही, असे बोलले जाऊ लागले आहे. पण वास्तव कदाचित वेगळेही असू शकेल. महाविकास आघाडीतील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यामध्ये आलेली आहे, त्यावर लवकरच शिक्कामोर्तब केले जाईल. आम आदमी पक्ष (आप) आणि काँग्रेस यांच्यामध्ये समन्वय होण्याची शक्यता नसल्याचे बोलले जात होते पण, या दोन्ही पक्षांमध्येही सामंजस्य होताना दिसत आहे. मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल यांच्या बैठकीनंतर दिल्ली आणि पंजाबचाही प्रश्न मार्गी लागल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे गोवा, गुजरात आणि हरियाणातही या दोन पक्षांमध्ये जागावाटप होऊ शकेल. 'इंडिया'च्या दृष्टीने जागावाटपाची चर्चा अडली आहे, ती तीन राज्यांमध्ये; पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेश. इथे काँग्रेस आणि घटक पक्ष एकमेकांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. वाटाघाटी होत असताना दबावाचा खेळ दोन्हींकडून खेळला जात असतो. त्यातून खरगेंसारखे परिपक्व नेतृत्व मार्ग काढू शकते. पश्चिम बंगालमध्ये 'माकप'ने तृणमूल काँग्रेसशी आघाडी न करण्याचा निर्णय आधीच जाहीर केला होता. 'माकप'च्या म्हणण्यानुसार, तृणमूल काँग्रेस, काँग्रेस आणि 'माकप' हे तीन पक्ष एकत्र लढले तर विरोधी पक्षाची 'स्पेस' भाजपला मिळेल, त्याचा फायदा भाजपला होईल. पश्चिम बंगालमध्ये महाआघाडी करणे 'इंडिया'साठी नुकसानदायी आहे. जागावाटपाचा वाद असलेल्या राज्यांमध्ये वाट्याला येणाऱ्या जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले तर काँग्रेसच्या एकूण जागांमध्ये वाढच होणार आहे. हा विचार केला तर जागावाटपामध्ये काँग्रेसचे नुकसान होण्याची शक्यता नाही. हे पाहता जागावाटपाच्या प्राथमिक फेरीत गोंधळाचे वातावरण दिसत असले तरी हा तिढा सुटू शकतो. तसे झाले तर केरळ वगळता इतरत्र 'इंडिया'ला भाजपविरोधात एकास एक उमेदवार देता येऊ शकेल. मग, कदाचित २०२४ ची लोकसभा निवडणूक अपेक्षेपेक्षा अधिक चुरशीची झालेली पाहायला मिळेल. एकी राहिली तर भाजपच्या लाटेला घाबरण्याचे कारण काय?




सामाजिक

# 'हा' मोबदला पुरेसा असतो का?

मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. येथे अंगमेहनत, संगणकीय काम करणारे इत्यादी प्रकारातील सर्वच लोक येथे उदरनिर्वाहासाठी काम करत असतात. सध्याच्या महागाईच्या वणव्यात होरपळून जायचे नसेल तर केवळ रिकामटेकडे न राहाता मिळेल ते काम स्वीकारून कार्यरत राहिले जाते. काही जण तर ८-१० तासांची मुख्य नोकरी आणि साधारण ४ तासांचा 'पार्ट टाइम जॉब' असेही करतात. म्हणजे ही मंडळी घरी केवळ विश्रांती घेण्यासाठी येतात असेच म्हणता येईल. त्यांच्या या अतुलनीय मेहनतीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. अशा मेहनती वर्गामुळेच भारत विकासाची नवनवीन क्षितिजे पादाक्रांत करत आहे. त्यामध्ये अशा मेहनती वर्गाचा मोलाचा आणि सिंहाचा वाटा आहे. आपल्यातील ऊर्जा प्रतिदिन १३-१४ तास कशी कार्यरत ठेवावी? हे नक्कीच शिकण्याजोगे आहे. कारण ती कार्यरत ठेवल्याशिवाय इतके तास काम करणे अशक्य आहे.

मुलांचे शिक्षण, कुटुंबातील आजार-पण, कुटुंबाचा मासिक खर्च आदी लक्षात घेता कुटुंबातील केवळ एका सदस्याच्या तुटपुंज्या वेतनावर संसाराचा गाडा हाकला जात नाही. सरकारी कर्मचारी-अधिकारी यांना यात अपवाद मानावे लागेल. कारण ७ व्या वेतन आयोगानुसार ते गलेलठ्ठ वेतन घेत आहेत. असे असूनही ते कसे काम करतात? याचा अनुभव अनेक जण घेत असतात. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या वर्गाचे दुखणे वेगळे आहे. त्यांना कामाचे तास अधिक असतात. कामावर पोचण्याची वेळ पाळा-वी लागते. पण तिथून निघण्याची वेळ मात्र अनिश्चित असते. काम पुष्कळ आणि त्या तुलनेत मिळणारे वेतन मात्र असमाधानकारक असते. हे असंघटित क्षेत्राचे दुखणे दुर्लक्षित आहे. त्याला कोणी वाली नाही. केवळ राबत राहायचे. नोकरी टिकवणे आणि डोळ्यासमोर दिसणारे कुटुंब. या विचित्र कचाट्यात अडकलेले या क्षेत्रातील वर्गाची पिळवणूकच केली जाते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. निमूटपणे हे सर्व सहन करण्यास पर्याय नसतो. याविषयी आवाज उठवून या क्षेत्रातील ही अन्यायकारक जुलूमशाही मोडून काढण्यासाठी काय करायचे? याविषयी ७० अथवा त्याहून अधिक तास काम करण्याचे उपदेश करणारे बोलतील का? की माणसाने केवळ यंत्रासारखे काम करतच आयुष्य जगायचे?

७० किंवा त्याहून अधिक तास काम करण्यास नकार-आळस अजिबात नाही. पण कामाच्या नावे

**मी आजही आठवड्याला ७० घंटे काम करते. कामाच्या वेळी उत्साह ठेवला, तर सुट्टीवर असल्याप्रमाणेच वाटते. तुम्ही तुमच्या कामाचा आनंद घेतला पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका सुधा मूर्ती यांनी केले. काही दिवसांपूर्वी त्यांचे पती आणि इन्फोसिस आस्थापनाचे संस्थापक नारायण मूर्ती यांनी आठवड्याला ७० घंटे काम करण्याविषयी विधान केले होते. त्याचे समर्थन त्यांनी वरील विधानातून केले.**

राबवून घेणे कसे थांबवायचे? या संदर्भातही विवेचन केले पाहिजे. ते कोण करणार? असंघटित क्षेत्रात काम करणारा माणूस म्हणजे यंत्र नव्हे की त्याने केवळ काम एके कामच करत जीवन जगायचे. अशा जगण्याला काही अर्थ तरी आहे का? या प्रकाराला त्या कंपनीसाठी जगणे असे म्हणता येईल. मानवी शरीर आणि यंत्र यांत भेद आहे. कोणास कोणते शारीरिक-मानसिक आजारपण कधी जडेल याचा नेम नसतो. त्यावेळी त्या व्यक्तीची कार्यक्षमता निश्चितच आधीच्या तुलनेत कमी होते. मला सप्ताहाला ७० तास काम शक्य होते. ते सर्वांनाच शक्य होईल असे वाटत नाही. आपण घेत असलेला आहारही आ-पले शरीर अधिक काळ कार्यक्षम ठेवण्यात मोलाची भूमिका बजावतो. अन्नातील कसदारपणा कमी झाला आहे. त्यामुळे माणूस अल्प कालावधीत थकतो. ज्यांचा आहार पौष्टिक आहे. त्यांना आवश्यक ऊर्जा त्यातून मिळत राहाते. पण असा आहार सर्वांनाच परवडणारा नसतो. हेही तितकेच कटू सत्य आहे. तरीही माणूस कार्यरत आहे. हेही नसे थोडके. जसा देश तसा वेश असे म्हटले जाते. ढीगभर कामाच्या तुलनेत तुटपुंजे वेतन मिळणाऱ्या वर्गाची कुटुंब चालवताना होणारी तारेवरची कसरत अदखलपात्र



राहिली आहे. त्यांना पौष्टिक अन्न म्हणजे काय? हे केवळ वाचन-ऐकण्यापर्यंतच ज्ञात असते. त्या अन्नाची आणि तोंडाची गाठभेट होणे म्हणजे स्वप्न-वतच असते. अशा स्थितीत ७० वा त्याहून अधिक तास काम कसे करावे?

गृहिणी असणारी स्त्री सप्ताहाला किती तास काम करते? याची कोणी नोंद घेत नाही. ती काय घरीच असते. मी कामावर जातो. त्यामुळे कुटुंब चालते. असा एक विचार गृहिणी असणाऱ्या स्त्री वर्गाच्या संदर्भात दृढ झालेला आहे. घर म्हणजे कुटुंब सांभाळणेसुद्धा जबाबदारीचे काम आहे. कारण घरातील वृद्ध-मुले-पती यांना काय हवे-नको ते पाहणे आणि प्रत्येकाच्या आवडीनिवडीनुसार स्वतःला बदलणे ही गृहिणींची परीक्षाच असते. याचीही नोंद घेतली जावी. मुलांवर योग्य संस्कार करण्याची मोठी जबाबदारी गृहिणींवर असते. अन्यथा कुटुंबातील सदस्य आणि समाज यांच्या नजरेतून मुलांचा उद्दामपणा सुटत नाही आणि त्यासाठी पूर्णवेळ घरी असणाऱ्या गृहिणीकडेच बोट दाखवले जाते.

बचतगट, खानावळ (मेस) यांच्या माध्यमातून कार्यरत राहून स्त्री वर्गाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. या ठिकाणी करावी लागणारी अंगमेहनत आणि संगणकासमोर करावे लागण-ारे काम यांत फरक आहे. येथे सतत खर्च होणारी शारीरिक ऊर्जा हा कामाचा वेग आणि दिवसेंदिवस त्यांची आणि देशाची होणारी प्रगती यांतील महत्त्वाचा घटक असतो. मुख्य म्हणजे केवळ तासंतास कामच करत न राहाता वाढती स्पर्धा लक्षात घेता ग्राहकांना गुणवत्तापूर्ण-पौष्टिक पदार्थ कसे मिळतील? याचा विचार करून त्यानुसार तसा पालट घडवून आणणेही कौशल्यपूर्ण कामच असते. काम तर तसे अनेक जण करतात. पण त्यात प्रामाणिकपणा-कौशल्य-गुणवत्ता ओतली जात असताना त्याची नोंद घेतली जाणे महत्त्वाचे आहे. त्यांना पुढे नेण्यासाठी अधिक काय करता येईल? यासाठी त्यांना पुढचा मार्ग आधीच ज्ञात असला पाहिजे. मग बघा भारत किती वेगाने प्रगती करतो? देशाच्या आणि पर्यायाने जगाच्या मुख्य प्रवाहात स्त्रियांना आणण्यासाठी काय करता येईल? याचे मंथन आणि अचूक कृती झाली तरी भारतीय स्त्रिया कसे काम करतात? हे पाहण्यासाठी जग येथे आल्याशिवाय राहाणार नाही. आवश्यकता आहे ती त्यांच्या कामाची नोंद घेऊन त्याला योग्य प्रकारे मार्गरत करण्याची. वलयांकित नसलेली पण कुटुंब चालवण्यासाठी मेहनत करणाऱ्या स्त्रीच्या कार्याला तासांच्या तराजूत मोजता येणार नाही.

**- जयेश राणे, मुंबई.**

टुडेज् ब्लॉग

# गणकयंत्र मानव दत्तात्रय कापरेकर

महाराष्ट्रातील डहाणू येथे १७ जानेवारी १९०५ ला जन्मलेले द. रा. कापरेकर हे रामानुजन यांच्यानंतरचे जागतिक कीर्तीचे गणितज्ञ होते. ते देवळाली (जि. नाशिक) येथे शिक्षक होते. महाविद्यालयीन काळात त्यांना गणितातील रँग्लर परांजपे पारितोषिक मिळाले होते. अत्यंत साध्या राहणीच्या कापरेकरांचा धोतर, कोट, टोपी हा नेहमीचा वेश. नोकरी करत असताना आणि निवृत्तीनंतरही त्यांचा गणितातील मजेशीर संख्यांचा शोध चालूच होता. त्यांना गणिताचा छंदच जडला होता, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या छंदामुळे त्यांची नोकरीच्या काळात हेटाळणी होत असे, पण याच छंदामुळे त्यांचे नाव जगभर गाजले. कापरेकर यांनी केलेल्या कामावर विद्यापीठांमध्ये संशोधन चालत असे. नोकरीच्या निमित्ताने कंटाळवाणा रेल्वेप्रवास करताना आणि रेल्वेस्थानकामध्ये रिकाम्या वेळेत तिकिटावरच्या संख्येशी खेळता-खेळता 'डेम्लो' संख्येच्या रूपाने त्यांना वैशिष्ट्यपूर्ण आणि मजेशीर संख्या सापडल्या. सध्या आपण सर्व जण वापरत असलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकांची दहा अंकी संख्या हे त्यांच्याच कल्पनेचे फलित असून 'नोकिया' या सुप्रसिद्ध कंपनीने त्यांच्या कार्यालयात यासंबंधीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे.

याशिवाय कापरेकरांनी दत्तात्रय संख्या, संगम संख्या, वानरी संख्या, हर्षद (आनंददायक संख्या), द्विमुखी संख्या, हस्तलाघव संख्या, आंदोलक संख्या, स्वयंभू संख्या, विजय संख्या, रिक्तभरण संख्या, विच्छेदक संख्या, तिरप्या झेपेच्या संख्या अशा कितीतरी संख्या तसेच १३ या संख्येवरील प्रेम, १०८९ ची गंमत, वाढदिवसांच्या तारखांची गंमत, रामानुजन यांच्या १७२९ या संख्येची सहा रूपे, मूषक उड्डाण उपपती, जादूचे अनेक चौरस आदींचा शोध लावला. या संख्यांवर आधारित अनेक लेख, पुस्तके लिहिल्यामुळे कापरेकरांना जगभरात मान्यता मिळाली.



कापरेकर स्थिरांक : कोणत्याही चार अंकी संख्येतील (चार अंक सारखे असू नयेत) आकड्यांची चढत्या, उतरत्या क्रमाने मांडणी करून वजाबाकी करत गेल्यास (सातव्या वेळेपर्यंत) ६१७४ ही संख्या मिळते. म्हणजेच कोणत्याही संख्येत ६१७४ ही संख्या लपलेली असते, तिला कापरेकर स्थिरांक म्हणतात. अमेरिकन 'मॅथेमॅटिकल मंथली' मध्ये याची मार्टिन गार्ट्न नावाच्या लेखकाने नोंद घेतली असून कापरेकरांनी शोधलेली ६१७४ ही संख्या कापरेकर 'स्थिरांक' म्हणून मान्य झाली. उदाहरणार्थ: २१३४ ही संख्या घेतल्यास खालील कोष्टकात दाखविल्याप्रमाणे तिसऱ्याच वेळी ६१७४ हे उत्तर येते.

मूषक उड्डाण उपपती : १९२२ साली दत्तजयंतीच्या रात्री कापरेकर त्यांच्या खालापूर येथील घरी कंदिलाच्या प्रकाशात आकडेमोड करीत असताना खुंटीला अडकवलेले एक पोळ्यांचे गाठोडे त्यांच्या कागदावर पडले आणि एक उंदीर इकडून तिकडे पळाला आणि त्याच क्षणी त्यांना बराच वेळ डोक्यात चाललेल्या ७७७ ५५ = ५५५ ७७, ५५५५ ४४४ = ४४४४ ५५५, १४१४१४१४ २७२७ = २७२७२७२७ १४१४ या गुणाकारांची संगती उकलली. म्हणून यास मूषक उड्डाण उपपती हे नाव दिले.

डेम्लो संख्या : ज्या संख्यांच्या अंकाचे डावा, उजवा आणि मधला असे तीन गट पडतात आणि डाव्या व उजव्या गटातील अंकांची बेरीज केल्यास वारंवार येणारा अंक मधल्या गटात असतो, त्या संख्यांना डेम्लो संख्या म्हणतात. उदाहरणार्थ: १६५; १+५=६, ३७७७४; ३+४=७ किंवा ३२९६७ ; ३२+६७=९९. १९२३ साली मुंबई-डोंबिवली प्रवासात आगगाडी, डबे, इंजीन, प्रवासी तिकिटांचे नंबर यांचा बारकाईने अभ्यास करून गणितात अशा विशिष्ट संख्या आहेत हे कापरेकर यांनी दाखवून दिले.

दत्तात्रय संख्या : १३, ५७, १६०२, ४०२०४ या संख्यांना दत्तात्रय संख्या म्हणतात. कारण, त्या संख्यांच्या वर्गाचे दोन किंवा अधिक भाग केले तर त्यांतील प्रत्येक भाग हा पूर्ण वर्ग असतो. उदाहरणार्थ, १३ऑ=१६९. (१६ आणि ९ हे पूर्ण वर्ग आहेत). दत्तात्रयात ब्रम्हा, विष्णू, महेश अशा तीन देवता आहेत; तसेच, तीन वर्गदर्शन देणाऱ्या संख्याही गणितात आहेत हे कापरेकर यांनी दाखवून दिले.

'गणित हे सौंदर्याचा आद्य नमुना आहे' या प्रसिद्ध खगोलशास्त्री योहान केप्लर यांच्या सुप्रसिद्ध वचनाची कापरेकरांच्या गणितातील शोधाकडे पाहिल्यास प्रचिती येते. यदाकदाचित ते पश्चात देशात जन्मले असते तर त्यांना अनेक मान-सन्मान मिळाले असते, मात्र दुर्दैवाने तसे देशात किंवा महाराष्ट्रात होताना दिसत नाही. त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने, त्यांच्या संशोधनातून प्रेरणा घेऊया आणि गणिताबद्दलची गोडी वाढवू या.

**- विजय कोष्टी, सांगली.**

जन्म हा अखेरचा

# आदिप्रसादीस्थल



**अनेक जन्मशुद्धस्य निरहंकारभाविनः ।**
**अप्रपंचस्यादिदेवः प्रसीदति विमुक्तये**

।।१८.५८।। परमात्मा अत्यंत शुद्ध असल्याने जो शुद्ध जीवात्मा आहे, त्याच्यावर तो कृपा करतो. अनेक जन्मांत मनुष्य स्वतःला अशुद्ध करीत आलेला आहे. खरे तर त्याला अंत:करणशुद्धीसाठी एका जन्मात शंभर वर्षांचे आयुष्य मिळालेले असते. शंभर वर्षांचे आयुष्य काय केवळ शरीरभोगासाठीच दिलेले असते? वासना असल्यामुळे त्यांनी भोग भोगावेत, परंतु वासनेचा क्षय करून अंतरंगशुद्धीसाठीही प्रयत्न करायला हवेत. अंत:करण अशुद्ध होते ते आपल्या कर्मामुळे आणि शुद्ध होईल ते देखील आपल्या कर्मांनीच. निषिछ्ध कर्मे करुन अंत:करण अशुद्ध होते. अशुद्ध कर्मांनी वासना अशुभ होते आणि अशुभ वासनेमुळे जीवात्म्याकडून निषिद्ध कर्मे घडू लागतात. शास्त्रात जी कर्मे करा असे सांगितले आहे ती विहित कर्मे होत. विहितकर्माचे नित्य कर्म, नैमित्तिक कर्म, काम्य कर्म इत्यादी प्रकार आहेत. जीव कर्मे करतो, कर्मफळे भोगण्यासाठी पुन्हा जन्म घेतो. असे कर्मचक्र सतत फिरत राहते. कर्माची गती गहन आहे, असे यामुळेच म्हणतात. ज्या कर्मात कामना असते ते काम्य कर्म होय. विशेष प्रसंगी करावे लागणारे कार्य हे नैमित्तिक कर्म होय तर रोज करावे लागणारे कर्म हे नित्य कर्म होय. नित्य कर्म केल्याने विशेष पुण्यलाभ होत नाही. परंतु ते न केल्यामुळे पाप मात्र लागते. नित्य कर्म केल्याने अंत:करणातील मलिनता जाऊन अंत:करण शुद्ध होते. कर्म केल्यावर त्याचे फळ भगवंताला अर्पण केले जाते तेव्हा त्याला निष्काम कर्म म्हणतात. अनेक जन्मांत निष्काम कर्म केल्यामुळे अंत:करण शुद्ध होते. त्यामधले मालिन्य समूळ निघून जाते. कर्म केल्यानंतर हे कर्म मी केले असा अहंकार जागा होत नसेल तर अंत:करण शुद्ध झाले असे समजावे. निष्काम कर्म करुन मी एवढे कर्म केले परंतु, त्याचे फळ मागितले नाही, असा अभिमान जर वाहिला तर त्या निष्काम कर्माचा काही उपयोग नाही. निरहंकारता हे अंत:करणशुद्धीचे लक्षण होय. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे

किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका, ज्यांनी आपल्या गायन कलेने शास्त्रीय संगीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले त्या स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ज्येष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर व त्यांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन त्यांनी गायनाला सुरुवात केली. ख्याल गायकीसह ठुमरी, दादरा, गझल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व भावगीत यांचे प्रभुत्व होते.



आपल्या कार्यक्रमात त्या अनेकदा स्वतः रचलेल्या बंदिशी रचत. त्यांनी स्वतःच्या स्वतंत्र शैलीत संगीतातील नवे राग निर्माण केले. शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनी डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनमार्फत त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रचार केला. भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. डॉ. प्रभा अत्रे या केवळ शास्त्रीय गायिकाच नव्हत्या तर त्या संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका आणि विदुषीही होत्या. त्यांनी इंग्रजी व हिंदी भाषेत संगीतावर अनेक पुस्तके लिहिली आहेत. प्रभा अत्रे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यात घालवले. त्यांच्या संगीत कलेची दखल घेऊन शासनाने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण हे तिन्ही मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीताचा एक आयाम संपला आहे. डॉ. प्रभा अत्रे यांना भावपूर्ण श्रद्धांजली! **- श्याम ठाणेदार, दौंड.**

# लोकसंस्कृतीचा उदय

आपल्या भाषेतून, आपल्या जगण्यातून, आपल्या वर्तनातून मानवी संस्कृती झिरपत असते. ती सदैव प्रवाही असते. म्हणूनच प्रत्येक काळात संस्कृतीची रूपे, तिचा चेहरा आपण बदललेला पाहतो. काही बाबतीत मात्र आपली संस्कृती अत्यंत कठोर असते. ती बदलत नाही. एकाच व्यापक अशा भूभागात अनेक संस्कृती नांदत असतात. त्यांच्या चालीरीती आणि जगण्याची पद्धत खूप वेगळी असते. या सामूहिक प्रकटनातूनच लोकसंस्कृती निर्माण होते. या लोकसंस्कृतीची रूपे न्याहाळणेही खूप गंमतीशीर असते. त्याची माहिती करून घेण्याच्या उद्देशानेच या लेखमालेचा श्रीगणेशा या नवीन वर्षात आपण करीत आहोत.

संस्कृतीची संकल्पना बहुआयामी असल्याने तिची सर्वसमावेशक व्याख्या आजवर कुणालाही करता आली नाही. संस्कृतीमध्ये जशी विविधता आहे तशीच तिच्या धारणेतही आहे. किंबहुना संस्कृती म्हणजे काय हे माहीत नसले तरी आपण तिच्याबद्दल बोलतो. तिचे गोडवे गातो, तर कधी कधी तिच्या नावाने शंखही करतो. मानवी जीवनाला समग्रपणे व्यापणारी ही धारणा असल्याने मानवी जीवनाचा आणि संस्कृतीचा संबंध माणसाच्या पूर्वापार चालत आला आहे. माणसाच्या उत्क्रांत अवस्थेपासून त्याची संस्कृती बदलत आली आहे. त्यामुळे माणूस, निसर्ग आणि माणसाच्या जगण्याशी संबंधित असणारे सर्व घटक संस्कृतीने व्यापले आहेत.

या निसर्गात माणूस हा एकमेव प्राणी असा आहे की त्यालाच बुद्धीचे, प्रतिभेचे, कल्पनेचे वरदान लाभल्याने त्याने आपले जीवन इतर मानवेतर सृष्टीपेक्षा वेगळे बनवले. त्यामुळे निसर्गातील इतर सृष्टी आणि त्यांचे जीवन स्थिर राहिले. त्यात कोणताही बदल झाला नाही. ते स्थायी स्वरूपात आजही जसे आहे तसेच राहिले, पण माणसाचे मात्र तसे झाले नाही. तो प्रत्येक युगात, प्रत्येक टप्प्यावर बदलत गेला. उदा. पक्षी आपल्या निवाऱ्यासाठी घरटे बांधतात. ती घरटी आजही जशी आहे तशीच आहेत. त्यात कोणताही बदल झाला नाही, परंतु निसर्गत:च तयार झालेल्या गुहेत राहणारा माणूस मात्र आज उंचच उंच इमारतीमध्ये येऊन स्थिरावला. एवढेच नाही तर परगृहावर जाऊन राहण्याची स्वप्ने तो बघत आहे. त्याच्या राहण्याच्या, खानपानाच्या पद्धती बदलत गेल्या. हे सर्वच बाबतीत आपणास सांगता येते.

रानटी अवस्थेत असणारा माणूस कसा उत्क्रांत होत गेला याचे ज्ञान आपल्याला मानववंशशास्त्र करून देते. डार्विनचा मानवी उत्क्रांतीचा सिद्धांत आपण शिकलेलो असतो, पण अशा सिद्धांतावरून मानवी प्रगतीबाबत आपण काही अनुमान करीत असलो तरी संस्कृती म्हणजे काय हे मात्र आपणास निश्चित सांगता येत नाही. असे असले तरी आपण जे जगतो किंवा आपल्या जगण्याशी निगडीत असणारे विविध घटक किंवा आपली जीवन जगण्याची पद्धत म्हणजे 'संस्कृती' अशी संस्कृतीची अगदी सोपी व्याख्या आपण करू शकतो.

ब्रिटिश आपल्याकडे आले आणि भारतीय माणूस बदलत गेला. नवे ज्ञान, साहित्य, भाषा, वेशभूषा याने त्यात कितीतरी बदल झाला. ब्रिटिश येण्यापूर्वी भारतीय माणूस कसा होता आणि आज कसा आहे? हा बदल आपण पाहत, अनुभवत आलो आहोत. आज आधुनिकीकरणानंतर उत्तर आधुनिकतेपर्यंत आपण येऊन पोहचलो आहोत. त्यामुळे माणसाच्या जगण्याच्या धारणा बदलल्या आहेत आणि काही धारणा मात्र अजूनही तशाच पक्क्या आहेत.

जीवन जगण्याच्या पद्धती म्हणजे संस्कृती असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा माणूस जगत असताना ज्या गोष्टी करीत असतो त्यांचा समावेश संस्कृतीत होतो. यातून साधी अभिवादनाची पद्धतसुद्धा आपली संस्कृतीच असते. माणसाचे जगणे जसे अनेक बाह्य घटकांनी युक्त असते तसेच त्यात आंतरिक घटकही महत्त्वाचे असतात. यालाच भौतिक आणि मानसिक घटक असेही आपणास म्हणता येते. भौतिक घटकामध्ये जे परिवर्तन, विकास आज आपण पाहतो ते सर्व घटक येतात, तर मानसिक घटकात आपल्या अध्यात्मासह अनेक अंगे येतात. चंद्राला चांदोमामा म्हणणे हेही त्यात येते. मानसिक संकल्पनेतून अशा अनेक गोष्टी विकसित झाल्या.



नीती-अनीती, श्रद्धा-अंधश्रद्धा, पाप-पुण्ये, देव-धर्म दैवते, जप-तप अशा अनेक गोष्टी यात समाविष्ट झाल्या. भौतिक बाबीत विज्ञान महत्त्वाचे मानले गेले. बुद्धीच्या, कल्पनेच्या बळावर माणसाने जसे विज्ञान शोधले, त्यातून आपला भौतिक विकास साधला, तशाच त्याने काही कल्पनेतून बाधक गोष्टीही निर्माण केल्या. चार्तुवर्ण्य व्यवस्था हे त्याचे ठळक उदाहरण. कारण जो माणूस पूर्वी एकच होता, माणूस हीच त्याची जात होती, तर पुढे जात-पात, वर्ण हे भेद कसे निर्माण झाले आणि या भेदक व्यवस्थेलाही आपण पुढे संस्कृती म्हणूनच का गौरवले? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. थोडक्यात संस्कृतीच्या पोटातूनच काही विकृतीही निर्माण झाल्या. त्याचा निर्माता कोण तर माणूसच!

एक राष्ट्र एक भाषा, एक राष्ट्र एक वेश असे आपले अजूनही नाही. त्यामुळेच खानपान, वेशभूषा, जातीपाती, सणवार-उत्सव, देव-दैवते-उपचार, आचारधर्म, विधी-विधाने, कुटुंब समाज, विवाह पद्धती असे अनेक बाबतीत एकाच राष्ट्रात अनेक भेद झालेले आपण पाहतो. यातूनच संस्कृतीची विविधरंगी रूपे आपण अनुभवत असतो. संस्कृतीची ही विविध रूपे पाहणे, त्याची माहिती करून घेणे या उद्देशानेच या लेखमालेचा श्रीगणेशा या नवीन वर्षात आपण करीत आहोत. लेखमाला सुरू होण्याच्या पहिल्या कृतीला श्रीगणेशा म्हणणे हेही आपल्या संस्कृतीचेच, आपल्या भाषेचे अविभाज्य अंग हे आपणास कळते, पण परदेशी व्यक्तीला हे कळणार नाही. आपल्या भाषेतून, आपल्या जगण्यातून, आपल्या वर्तनातून मानवी संस्कृती झिरपत असते. ती सदैव प्रवाही असते.

**- डॉ. अशोक लिंबेकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त

### आज छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन स्मृती सोहळा

**सोलापूर** : छत्रपती संभाजी महाराजांच्या ३४३ व्या राज्याभिषेक दिन स्मृती सोहळा मंगळवार दि. १६ जानेवारी रोजी होणार आहे. शंभूप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आग्रहाचे निमंत्रण शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समितीच्यावतीने दिले आहे. श्री छत्रपती संभाजी महाराज चौक येथे सोहळा होत आहे. सकाळी ध्वजवंदनेनंतर सोहळ्यास सुरुवात होणार आहे. हभप सुधाकर महाराज इंगळे यांच्याहस्ते हा सोहळा होणार असून त्यानंतर अतिथींचा सत्कार व मिठाई वाटप होणार आहे. ध्वजवंदन सकाळी ९:३० वाजता असून त्यानंतर सायंकाळी ४ वाजेपर्यंत रक्तदान शिबीर होणार आहे. रक्तदात्यास छत्रपतींची मुर्ती देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे संयोजक समितीतील सदस्य बाळासाहेब गायकवाड, अमोल जाधव, शिरीष जगदाळे यांनी सांगितले आहे.

### आशा मराठी विद्यालयात राजमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद व चार हुतात्म्याना अभिवादन

**सोलापूर** : नीलमनगर येथील रणजिसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादुल प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा दिन व राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांची जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे पुजन संस्थेचे अध्यक्ष हारुण पठाण, राम गायकवाड यांच्याहस्ते करण्यात आले. आशा मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तस्लीमाबानो पठाण, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सय्यद आफरीन, गंगाधर स्वामी, वीरभद्र यादवाड हे प्रमुख पाहुणे होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. राम गायकवाड यांनी चार हुतात्म्यांच्या कार्याची माहिती दिली. राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल लिंगय्या मेळकुंदे यांनी सांगितले. सुत्रसंचालन चंद्रकांत शिरगापूरे यांनी केले. आभार सौरभ भांड यांनी मानले.



**सोलापूरः श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, चार हुतात्म्यांच्या प्रतिमांचे पूजन करताना मल्लिकार्जुन मोरडे, व्यंकटेश दुड्डम आदी.**

### श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती

**सोलापूर** : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती, हुतात्मा दिनानिमित्त श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयात अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक सहशिक्षक खंडू भोसले यांनी केले. प्रतिमापूजन संस्थेचे सचिव व्यंकटेश दुडम, मुख्याध्यापक मल्लिकार्जुन मोरडे, यांनी केले. मुख्याध्यापक मोरडे, सहशिक्षिका दुलंगे, आरकेल मानकर यांनी विचार व्यक्त केले. भोसले यांनी आभार मानले.



**कुचन प्रशालेच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्यात प्रा. श्रीनिवास कोंडी, नागनाथ गंजी, श्रीधर चिट्याल उपस्थित होते.**

### कुचन प्रशालेत वार्षिक पारितोषिक वितरण

**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ,कुचन प्रशालेत वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोडी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार नागनाथ गंजी, शालेय समिती अध्यक्ष श्रीधर चिट्याल, विश्वस्त दिनेश यन्नम, मधुकर कट्टा, विजयकुमार गुल्लापल्ली, ॲड. श्रीनिवास कटकूर, रमेश बोध्दल, हरिष कोडा, गणेश गुज्जा, श्रीनिवास पोशम, सर्व विश्वस्त, उपप्राचार्य अनिल निंबाळकर उपस्थित होते. सरस्वतीपूजन व दिपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रास्ताविक प्राचार्य युवराज मेटे यांनी केले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सहशिक्षिका सविता चिप्पा यांच्या मार्गदर्शनाखाली निर्मित पद्मज्ञानामृत या हस्तलिखिताचे व सहशिक्षिका कविता गेंगाणे यांनी केलेल्या वर्षभरातील बातमी संकलनाचे प्रकाशन झाले. शैक्षणिक वर्षातील आदर्श वर्गाची नावे घोषित करण्यात आली. या वर्गांचे वर्गशिक्षक सुरेश करजगीकर, पल्लवी ननवरे, कविता गेंगाणे, संतोष पवार व वर्गप्रतिनिधींचा सत्कार झाला. देणगीदारांचे ऋणनिर्देश तसेच पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे यादीवाचन बसवराज हिटनळ्ळी व क्रीडा विभाग पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे यादीवाचन पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू यांनी केले. प्रशालेतील शैक्षणिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रात यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण झाले. ऑल इंडिया ड्रॉईंग कॉम्पिटिशन २०२३-२४ मध्ये कलारत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल ओम नारकर याचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप प्रा. श्रीनिवास कोंडी यांनी केला. याप्रसंगी उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, मल्लिकार्जुन जोकारे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मलिक पठाण यांनी तर आभारप्रदर्शन प्रणिता सामल यांनी केले.

# शिंदे कारखान्याकडून ऊस बिलाचे ६३ कोटी बँकेत जमा

## आ. बबनराव शिंदे; जानेवारीत प्रतिटन ५० रुपये, फेब्रुवारीत १०० रुपये तर मार्चमध्ये १५० रुपये वाढीव दर

सुराज्य/टेंभुर्णी

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब कारखान्याचे १० जानेवारीअखेर ऊसबिल व ३१ डिसेंबरअखेर ऊस तोडणी वाहतूक बिल शेतकरी व वाहनमालक यांच्या खात्यावर जमा केल्याचे संस्थापक अध्यक्ष आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले.



दोन्ही कारखान्यांचा गाळप हंगाम जोमाने सुरू असून युनिट नं.१ येथे प्रतिदिन तेरा ते साडेतेरा हजार टन व युनिट नं.२ येथे प्रतिदिन साडेचा ते पाच हजार टन गाळप होत आहे. युनिट नं.१ येथे आजअखेर ९ लाख ३१ हजार ५८४ टन ऊस गाळप झाले आहे. हंगामामध्ये युनिट नं.१ कडे सहवीजप्रकल्पातून आजअखेर ३ कोटी ८३ लाख ६२ हजार ५०० युनिट वीज निर्यात केली आहे. डिस्टीलरी प्रकल्पातून १ कोटी ८४ लाख ७० हजार लि. अल्कोहोल व १ कोटी ४५ लाख ५८ हजार लि.इथेनॉल उत्पादन झाले आहे. युनिट नं.२ येथे आजअखेर ३ लाख १९ हजार ०९३ टन ऊस गाळप होवून सहवीज प्रकल्पातून आजअखेर १ कोटी १७ लाख ३७ हजार युनिट वीज निर्यात केली आहे. दोन्ही युनिटचे मिळून आजअखेर १२ लाख ५० हजार ६७७ टन ऊसगाळप झालेले आहे.

गळीत हंगामामध्ये युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंबकडे १ ते १० जानेवारी या कालावधीत गाळपास आलेल्या १० दिवसाचे ऊसास प्रति टन रू.२७००/-प्रमाणे पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केला आहे. त्यापोटी कारखान्याने ४५ कोटी बँकेत जमा केले आहेत. तसेच दोन्ही युनिटकडे ऊस तोडणी वाहतूकीसाठी असलेल्या वाहनचालकांची दि.३१ डिसेंबर अखेरपर्यंतची तोडणी वाहतूक बिले अदा केली आहेत. त्यापोटी १८ कोटी ५७ लाख जमा केले आहे. ऊस व तोडणी वाहतूक बिलाची मिळून ६३ कोटी ५७ लाख रक्कम शेतकरी व वाहनमालकांच्या खात्यावर जमा केली आहे, असे आ. शिंदे यांनी सांगितले.

### उशीरा गाळप होणाऱ्या उसाला महिन्याप्रमाणे वाढीव दर

सन २०२३-२४ गळीत हंगामात १६ ते ३१ जानेवारी,२०२४ मध्ये गाळपास येणा-या सर्व ऊसासाठी जाहीर केल्याप्रमाणे उत्तेजनार्थ अंतिम ऊस दरापेक्षा प्रतिटन प्रतिटन ५० रुपये, फेब्रुवारीत १०० रुपये तर मार्चमध्ये १५० रुपये वाढीव दर देणार असून दोन्ही कारखान्यास उस पुरवठा करावा, असे आवाहन आ.बबनराव शिंदे यांनी केले आहे. याप्रसंगी उपाध्यक्ष वामन उबाळे कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे, जनरल मॅनेजर सुहास यादव आदी उपस्थित होते



# पंढरपुरात नाट्य संमेलनाच्या निमित्ताने कलाकारांची बैठक

सुराज्य/पंढरपूर

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने स्थानिक कलाकारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत नाट्य संमेलन काळात २० जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान पंढरपुरातील रसिकांसाठी सादर होणाऱ्या कलाविष्कारांची चर्चा झाली.

संमेलनात दि. २० जानेवारी रोजी पंढरपुरातील स्थनिक कलाकार आपला कलाविष्कार दाखविणार आहेत. पंढरपुरातील जुन्या आणि नव्या पिढीतील नाटय कलाकार, शाहिरी कलाकार, लोक कलाकार, गायक कलाकार, नृत्य कलाकार, भारुड कलाकार, लावणी, भजन, कीर्तन पथनाट्य अशा विविध कलाकारांचे सादरीकरण या १०० व्या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने होणार आहे.

कलाकारांच्या बैठकीचे आयोजन पोलीस संकुल रखुमाई सभागृह या ठिकाणी करण्यात आले होते. बैठकीस जेष्ठ कलाकार विनय महाराज बडवे, रेडिओ स्टार दिलीप टोमके, भारुडकार चंदाताई तिवारी, संध्या साखी, डॉ. प्राजक्ता बेणारे, शिवराज सरणाईक, विजय व्यवहारे, नाटय कलाकार शाम सावजी, संतोष शिरगिरे ,रविंद्र शेवडे, दिलीप सुरवसे, अजित व्यवहारे ,कालिदास सोनवणे, आशिष शहा नाटय परिषदेचे अध्यक्ष डॉ. मंदार सोनवणे, उपाध्यक्ष दत्तात्रय जगताप , सहकार्य वाहक राजाभाऊ उराडे, कोषाध्यक्ष विक्रम बिस्किट आदी उपस्थित होते.

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्काराचे वितरण

## 'कवी इंद्रजीत भालेराव, सुवर्णालता नाईक -निंबाळकर यांचा झाला सन्मान

सुराज्य/अकलूज

श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट शंकरनगर अकलूज यांच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

विशेष साहित्य पुरस्कार कवी इंद्रजीत भालेराव यांना रोख ५१ हजार व सन्मानचिन्ह तर साहित्य पुरस्कार लेखिका सुवर्णलता नाईक -निंबाळकर यांना रोख २५ हजार व सन्मानचिन्ह या स्वरुपात माजी साहित्य संमेलन अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्याहस्ते व माजी उपमुख्यमंत्री विजयसिह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला. याप्रसंगी मदनसिंह मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, पुरस्कार निवड समिती अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शीतलदेवी मोहिते-पाटील उपस्थित होते.

वारणानगर, प्रवरानगर आणि अकलूज ही कृषी क्षेत्रातील तीर्थस्थळे आहेत. ज्या सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांनी संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांच्या हितासाठी घालवले त्यांच्या नावाचा पुरस्कार आज मिळाला मिळाला आहे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन कवी इंद्रजित भालेराव यांनी यावेळी केले. अकलूजचा पुरस्कार म्हणजे माहेरचा पुरस्कार आहे असे डॉ. सुवर्णलता नाईक -निंबाळकर यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी स्वरूपाराणी मोहिते-पाटील मंडळाचे विश्वस्त ॲड. नितीन खराडे, चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत, वसुंधरा देवडीकर, सचिव अमरसिंह माने-देशमुख, आदी उपस्थित होते.



**साहित्य पुरस्कार वितरणप्रसंगी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, शीतलदेवी मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, विजयसिह मोहिते पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील आदी.**

> सहिष्णूता हा भारतीय संस्कृतीचा पाया असून समाजाला साहित्याची गरज आहे. परंतु हल्ली मोबाईलमुळे नवीन वाचकांचे प्रमाण कमी झाले आहे. ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा जास्त वाचक आहेत ही वस्तुस्थिती आहे.
>
> – **लक्ष्मीकांत देशमुख**, माजी अध्यक्ष, साहित्य संमेलन.

# सद्गुरु कारखान्यावर उच्चांकी रक्तदान

## कारखान्याचे अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

सुराज्य/पिलीव

सांगली,सातारा आणि सोलापूर जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेल्या सद्गुरु श्री श्री रविशंकर साखर कारखाना,श्रीनगर येथे कारखान्याचे अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या शिबीरात उच्चांकी रक्तदान झाले.

गेल्या बारा वर्षापासून सद्गुरु श्री श्री रविशंकर साखर काखान्याने निस्वार्थी उद्देशाने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. त्याबद्द्ल सभासद शेतकऱ्यांमध्ये समाधाची भावना असून कारखान्याचे अध्यक्ष एन.शेषागिरी राव व उपाध्यक्ष बाळासाहेब कर्णवर पाटील यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त कारखाना स्थळावर आयोजित विविध उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. रक्तदान शिबिर, टी.टी.चे लसीकरण व आरोग्याच्या इतर तपासण्या करण्यात आल्या. प्रारंभी कारखान्याचे संचालक व व्यवस्थापक रामाराव, सर्व अधिकारी पदाधिकारी आदींच्या उपस्थितीत सद्गुरु श्री. श्री. रविशंकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करुन शिबिरांना सुरुवात झाली.



शिबीरांनंतर सांगली आर.टी. ओ. कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सर्व वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करून अपघात टाळण्याबाबतचे उपाय सांगितले. सद्गुरु परिवाराकडून उपस्थित पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्ती एन. शेषागिरी राव व बाळासाहेब कर्णवर पाटील यांचा वाढदिवसानिमित्त तीन जिल्ह्यातील असंख्य सभासद, लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत पुष्पहार, गुच्छ, शाल, फेटा देऊन सत्कार केला.

कामगार प्रतिनिधी अश्विनी तेली यांनी औक्षण केले. व्यवस्थापकीय संचालक उदय जाधव व इतरांनी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. शेषागिरी राव व मा .बाळासाहेब कर्णवर पाटील यांनी सर्वांना सहभागाबद्दल धन्यवाद दिले.

# मकर संक्रांतीच्या खरेदीसाठी मोहोळ बाजारात गर्दी

सुराज्य/चिखली

वर्षाच्या सुरुवातीला येणाऱ्या मकर संक्रांत सणाच्या मुहूर्तावर संक्रांतीला लागणाऱ्या साहित्यांची दुकाने गजबजल्याने. रविवार( दि१५) रोजी मोहोळच्या आठवडा बाजारात वस्तू खरेदीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने आठवडा बाजाराला खरेदीसाठी चांगलेच स्वरूप आल्याचे दिसून आले .

मोहोळच्या आठवडा बाजारात मोठ्या प्रमाणात भाज्यांची आवक झाल्याने दर स्थिर होते. साखर आणि गुळ दरात वाढ नसल्याने संक्रांतीकरीता मागणी असणाऱ्या तीळगुळ, तिळाचे लाडू, तिळाची चिक्की, गुळाच्या रेवढ्या आदी किमंतीमध्ये ही वाढ झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे लोकांना परवडणाऱ्या किमतीत त्या वस्तू मिळत होत्या. सणाच्या अनुषंगाने बाजारात विविध पालेभाज्या, संक्रांतीचे खण, हळद- कुंकू, तीळगुळ, साखर रेवडी, सुपारी, खारीक, चुडा - पाटली, नाग वेलीची पाने आदी वस्तूंचे स्टॉल्स लागले होते. सौभाग्याचे प्रतिक म्हणून चुड्या - पाटल्या खरेदीसाठी महिलांनी गर्दी केल्याचे पहावयास मिळाले.

यंदा मातीचे खेप सध्या ११ हजार रूपयांना मिळते. अन्य खर्च पाहता धंदा परवडणारा नाही,असे दीपक कुंभार यांनी सांगितले.

# धनश्री अर्थकारणाच्या परंपरेचा तीन दिवस दिमाखदार सोहळा

## शरद पवार, सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत प्रा.शिवाजीराव काळुंगे यांचा अमृतमहोत्सव

सुराज्य/मंगळवेढा


धनश्री परिवार व सीताराम परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस धनश्री महिला पतसंस्था रौप्य महोत्सव व धनश्री मल्टीस्टेट तपपूर्ती सोहळानिमित्त दामाजी रोड, मंगळवेढा येथे दि. १७, १८ व १९ जानेवारी रोजी विविध कार्यक्रम होणार असल्याचे संचालिका ॲड. दिपाली काळुंगे - पाटील यांनी सांगितले.

मंगळवेढा येथे प्रा. शिवाजीराव काळुंगे व प्रा. शोभा काळुंगे यांचा सत्कार सोहळा व अमृत महोत्सवानिमित्त ग्रंथाचे प्रकाशन माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्याहस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे भूषवणार आहेत. शुक्रवार दि. १९ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता आहे.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ. ह. साळुंखे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार, सर्व कारखान्याचे चेअरमन, पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होणार आहेत.







बुधवार दि. १७ जानेवारीला सकाळी १० वाजता सर्वरोगनिदान महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन आ. समाधान आवताडे , अध्यक्षस्थान शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी सावंत हे भूषवणार आहेत. दुपारी २ वाजता धनश्री महिला पतसंस्था रौप्य महोत्सव असून उद्घाटक जयमाला गायकवाड आहेत. अध्यक्षस्थान माढा नगराध्यक्षा मीनल साठे भूषवणार आहेत. सायंकाळी ७ वाजता कुणाल मचालेकृत 'आपली संस्कृती मराठमोळ्या' संस्कृतीचा नृत्य गीत संगीताचा अविष्कार सादर होणार आहे . कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आ. दीपक आबा साळुंखे पाटील हे असून अध्यक्ष म्हणून माजी आ.दत्तात्रय सावंत हे राहणार आहेत. गुरुवार दि.१८ रोजी संत परंपरेतील कीर्तनकार व प्रवचनकारांचा गौरव सकाळी ९ वाजता आहे. याचे उद्घाटन माजी प्राचार्य डॉ.आ.गो. पुजारी हे करणार आहेत. अध्यक्षस्थानी दामाजी मंदिर संस्था अध्यक्ष विष्णुपंत आवताडे हे राहणार आहेत. दुपारी २ वाजता धनश्री महिला पतसंस्था रौप्य महोत्सव, धनश्री मल्टीस्टेट तपपुर्ती सोहळ्याचे उद्घाटन आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ तानाजी सावंत यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमासाठी खा. धनंजय महाडिक, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी शिलाई मशीन वाटप, धनश्री मल्टीस्टेटच्या आजी-माजी संचालकांचा सत्कार, स्मरणिका प्रकाशन, रौप्यमहोत्सवी भेट चांदीचे नाणे याचे अनावरण होणार आहे. सायंकाळी ७ वाजता उषा मंगेशकर संगीत रजनी यांचा मराठी हिंदी गीतांचा कार्यक्रम आहे याचे उद्घाटक सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे आहेत. अध्यक्षस्थानी विठ्ठल शुगरचे अध्यक्ष अभिजीत पाटील राहणार आहेत. शुक्रवार दि. १९ रोजी सकाळी ९ वाजता मंगळवेढा शिवार वैभव शेतीतील सर्वोत्कृष्ट उत्पादन पिकांचे प्रदर्शन असून याचे उद्घाटन उद्घाटन माजी जि. प. सदस्य वसंत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. मंगळवेढा पंचायत समितीचे माजी सभापती नंदकुमार पवार हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

सकाळी १० वा. 'तरुणाईचा भारत' या विषयावर परिसंवाद आहे. परिसंवादाचे प्रमुख वक्ते म्हणून वात्रटिकाकार रामदास फुटाणे, संजय आवटे, विजय चोरमारे हे उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बाबुराव गायकवाड व अध्यक्षस्थानी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके उपस्थित राहणार आहेत, असे श्री सद्गुरू सीताराम महाराज कारखान्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजलक्ष्मी काळुंगे-गायकवाड, धनश्री व सिताराम परिवाराच्या संचालिका स्नेहल काळुंगे- मुदगल यांच्यासह प्रा. शिवाजीराव काळुंगे अमृत महोत्सव गौरव समितीचे अध्यक्ष शिवानंद पाटील व कार्यकारी समितीने केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### आ. डॉ. विश्वजित कदम यांचा वाढदिवस साजरा

**पंढरपूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबे व इंदिरानगर जिल्हा परिषद शाळा चंद्रभागा शेड आंबे येथे कडेगाव पलुसचे आ. विश्वजीत कदम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा झाला. युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन शिंदे यांच्या नेतृत्वात शालेय साहित्य व खाऊ वाटपाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी बाळासाहेब काळे प्राथमिक शिक्षण सहकारी पतसंस्था पंढरपूरच्या चेअरमनपदी मारुती क्षीरसागर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी आंबेगावचे माजी उपसरपंच विठ्ठल शिंदे, सगण, आंबेगावचे उपसरपंच निशाल शिंदे, विठ्ठल सहकारी कारखान्याचे संचालक सचिन वाघाटे ग्रामपंचायत सदस्य अरुण शिंदे, अशोक शिंदे श्रीरंग कोळी, संभाजी शिंदे, गणेश कांबळे हरीश शिंदे, प्रकाश शिंदे, शाळा सुधार समितीचे अध्यक्ष माऊली कोळी, नितीन शिरगुर, मंगेश कोळी, बाळासाहेब शिंदे, महेश कोळी, अनिल चौधरी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



### स्वाती पाटील यांना आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार

**टेंभुर्णी** : सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था यांच्यावतीने देण्यात येणारा जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार २०२४ श्री विमलेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या स्वाती यशवंत पाटील-भोसले यांना आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सिंहगड इन्स्टिट्यूट सोलापूर येथे देण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश गुंड, उपाध्यक्षा सुप्रिया पांगुळ, संचालक जवानसिंग रजपूत, सचिव चंद्रकांत भोसले, सर्व संचालक मंडळ, पतसंस्थेचे सभासद व स्वेरीचे कर्मचारी उपस्थित होते.



### आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्काराने दत्तात्रय हिळ्ळी सन्मानित

**अक्कलकोट** : सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित बाळे यांच्यामार्फत सिंहगड इन्स्टिट्यूट सोलापूर येथे दत्तात्रय हिळ्ळी यांना जिल्हास्तरीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले. हा पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल शासकीय, विविध संस्थामार्फत आतापर्यंत चार पुरस्कार मिळाले असून, यंदाचा हा पाचवा पुरस्कार आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलेगावे, आनंदराव पाटील, गंगप्पा संगोळगी उपस्थित होते.

### इंडियन मॉडेल स्कूलची अंधारे रौप्य पदकाची मानकरी

**सोलापूर** : दिल्ली येथे दि. २ ते ८ जानेवारी २०२४ दरम्यान पार पडलेल्या ६७ व्या नॅशनल स्कूल गेम्स डायव्हिंग २०२३-२४ या राष्ट्रीय स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल (सी.बी.एस.ई) सोलापुरची अपूर्वा अंधारे हिने डायविंगमध्ये १४ वर्ष वयोगटात हायबोर्ड या क्रीडा प्रकारात रौप्य पदक पटकविले आहे. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कोच श्रीकांत शेटे आदींचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल तिचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

### नंदूरबार येथे सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

**नंदूरबार** : खानदेशी मुस्लीम खाटीक समाजातील २६ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा नंदूरबार येथे झाला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मुस्लीम बांधवांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सामील व्हावे, असे आवाहन केले. या बैठकीत अखिल महाराष्ट्र मुस्लीम खाटीक समाज महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेशचे अध्यक्ष मोहंमद युसूफ लतिफ खाटीक, शेरू हाजी, अरिफ गफूर, कार्यकारी अध्यक्ष हाजी डॉ. अ. रऊफ उमर, सामुदायिक विवाह सोहळ्याचे अध्यक्ष अस्लम खाटीक, शरीफ रमजान खाटीक, शकील खाटीक, ताहेर खाटीक, अकिल रमजान, कैसर खाटीक, कालु पहलवान, अजिज मुनाफ खाटीक, अ. गफ्फार उमर खाटीक, लियाकत गफुर खाटीक, ॲड सादिक खाटीक, हारून खाटीक, हाजी रशिद पहलवान, हाजी अजिज खाटीक, एजाज खाटीक उपस्थित होते.



# निवडणुकीच्या अनुषंगाने परस्परांत समन्वय ठेवा

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या पोलीस व महसूल विभागांना सूचना



**सुराज्य/सोलापूर**

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्व सहायक निवडणूक अधिकारी, नोडल अधिकारी व पोलीस विभाग यांच्यात परस्पर चांगला समन्वय असला पाहिजे. हाच समन्वय निवडणूक यशस्वी होण्यासाठी महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, पोलीस उपायुक्त अजित बिऱ्हाडे, मनपा उपायुक्त निखिल मोरे, सर्व सहायक निवडणूक अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, तहसिलदार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, 'जिल्ह्यात एकूण ३ हजार ५९९ मतदान केंद्र असून मागील लोकसभा निवडणुकीमध्ये एकही व्हलनेरबेल मतदान केंद्र नव्हते. यावेळी अशा मतदान केंद्राबाबत महसूल व पोलीस विभागाने निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे तपासणी करुन यादी करावी.

प्रतिबंधात्मक कारवाईच्या अनुषंगाने कलम १०७, ११० च्या प्रलंबित केसेस त्वरित निकाली काढाव्यात', अशा सूचना त्यांनी केल्या.

सर्व नोडल अधिकारी, सहायक निवडणूक अधिकारी व विभागाच्या अधिकाऱ्यांनी निवडणुकीत त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. पोलिसांनी सर्व मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या दृष्टीने नियोजन करावे तसेच क्रिटिकल मतदान केंद्राबाबत अधिक काळजी घ्यावी, असेही सांगितले.

निवडणूक विभागाने जिल्ह्यातील सर्व सेक्टरच्या याद्या पोलीस विभागाला उपलब्ध करून द्याव्यात. त्यानुसार लवकरच सर्व सेक्टर अधिकाऱ्यांच्या नियुक्ती पोलीस विभागाकडून करण्यात येतील. सर्व विभागात चांगले सहकार्य राहील, असे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सांगितले.

### जिल्ह्यात ३५ लाख ७८ हजार मतदार

उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी यांनी जिल्ह्यात ३५९९ मतदान केंद्र असून मतदाराची एकूण संख्या ३५ लाख ७८ हजार ६३३ इतकी आहे. १ हजार २४४ मतदान केंद्र महापालिका व नगरपालिका हद्दीत येतात तर २ हजार ३५५ मतदान केंद्र हे ग्रामीण भागात असल्याचे सांगितले.

# जुळे सोलापूरचा कायापालट करणार : आ. देशमुख

## २ कोटी ११ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**सुराज्य/सोलापूर**

'जुळे सोलापूर भागात तसेच दक्षिण तालुका मतदारसंघात विविध विकासकामे सुरू आहेत. ही विकासकामे मतदारसंघाची शोभा वाढवणार आहेत. आगामी काळात जुळे सोलापूरचा कायापालट होईल', असे आश्वासन आमदार सुभाष देशमुख यांनी दिले.

जुळे सोलापुरात सुमारे दोन कोटी ११ लाख रूपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करताना आमदार देशमुख बोलत होते. यावेळी संगीता जाधव, मनिषा हुच्चे, विशाल गायकवाड, अश्विनी चव्हाण, डॉ. शिवराज सरतो यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

विविध विकासकामांच्या माध्यमातून आपला दक्षिण सोलापूर मतदारसंघ अधिकाधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीने आपले सदैव प्रयत्न सुरू आहेत. यासाठी सर्वांच्या साथ आणि पाठबळाची गरज आहे, असे आमदार देशमुख म्हणाले.

यावेळी म्हाडा पाणी टाकी ते बॉम्बे पार्क ११०.९० लक्ष, मन्मीत ब्लॉसम ते सैफुल क्रॉस रोड ५७.९२ लक्ष, एचएसआर पाणी टाकी त केएलई शाळा ४२.८० लक्ष असा एकूण २ कोटी ११ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



### विकासकामांमुळे परिसराची शोभा वाढेल

जनतेच्या पाठबळावर आपण जुळे सोलापूर भागात जास्तीत जास्त निधी आणू. त्यातून होणारी विकासकामे मतदारसंघाची शोभा वाढवणार आहेत, असे आमदार देशमुख म्हणाले.

# स्पर्धेच्या युगात पालकांचा मुलांशी संवाद आवश्यक : प्रा. हळदीकर

## अकलूज येथे बालनाट्य प्रशिक्षण शिबीर



**सुराज्य/अकलूज**

'सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात टिकण्यासाठी प्रत्येकाच्या अंगी कला महत्त्वाची आहे. कला जोपासण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांशी व मुलांनी पालकांशी मोकळेपणाने संवाद साधणे गरजेचे आहे', असे मत प्रा. संजय हळदीकर यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मुंबई शाखा अकलूजच्यावतीने प्रा. संजय हळदीकर यांचे बालनाट्य प्रशिक्षण शिबीर झाले, यावेळी ते बोलत होते. नाट्य परिषदेच्या कार्याध्यक्ष शीतलदेवी मोहिते-पाटील यांनी मुलांच्या अंगी उपजत कलागुण असतात. या कलागुणांना वाव देण्याचे काम कार्यशाळेमध्ये होत असते. पालकांनी अभ्यासाबरोबरच मुलांच्या अंगी असलेल्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे काम करावे, असे सांगितले.

याप्रसंगी अभिनेते अजय तपकिरे, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, संचालक श्रीकांत राऊत, राहुल जगताप, सुनील कांबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले. सूत्रसंचालन नागनाथ साळवे यांनी तर आभार रवी नागटिळक यांनी मानले.

# मंगळवेढा तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान

**सुराज्य/लक्ष्मी दहिवडी**



पत्रकारदिनानिमित्त मंगळवेढा तालुक्यातील सर्व पत्रकारांचा आ. समाधान आवताडे यांच्याहस्ते जनसंपर्क कार्यालय, मंगळवेढा येथे सन्मान झाला. जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, राजेंद्र सुरवसे, शशिकांत चव्हाण, व्यंकटेश पटवारी, रघुनाथ मदने आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगळवेढा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष भीमराव मोरे यांनी केले.

याप्रसंगी प्रा. मनोजकुमार अवधूत, सचिन डंगळे, दत्तात्रय नवत्रे, हुकूम मुलाणी, ज्ञानेश्वर भगरे, दावल इनामदार, समाधान फुगारे, औदुंबर ढावरे, प्रमोद बिनवडे, शिवाजी केंगार, महेश पाटील, महेश वठारे, विजय भगरे, राजेंद्रकुमार जाधव, महादेव धोत्रे, सचिन हेंबाडे, मोहन पाटील, अक्षय पवार, प्रसाद कसबे, बापूसाहेब मासाळ, रोहिदास भोरकडे, नागेश मासाळ आदी पत्रकार परस्थित होते.

# विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीवर ॲड. जाधव यांची नियुक्ती



**पंढरपूर** : येथील नामांकित वकील ॲड. विजयकुमार जाधव यांची श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीवर कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती झाली आहे.

ॲड. जाधव हे पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयात गेल्या बारा वर्षांपासून कार्यरत आहेत. या दरम्यान, अनेक गाजलेल्या दिवाणी व फौजदारी खटल्यांमध्ये त्यांनी काम पाहिले आहेत. श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीची अनेक प्रकरणे जिल्हा न्यायालयात सुरू आहेत. त्यामध्ये कसलाही मोदबला न घेता केवळ सेवा म्हणून समितीच्यावतीने कामकाज पाहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार मंदिर समितीने नुकत्याच झालेल्या बैठकीत ठराव पारित करून त्यांची नियुक्त केली व मंदिर समितीचे व्यवस्थापक पुदलवाड यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर, राजेंद्र शेळके आदी उपस्थत होते.

# देशमुख यांच्या एकसष्ठीनिमित्त नागरी सत्कार सोहळा



**पंढरपूर** : तालुक्यातील कासेगाव येथील सुपुत्र जिल्हा परिषद सदस्य वसंत देशमुख यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त ग्रामस्थांच्यावतीने नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केल्याचे वसंत (नाना) देशमुख यांचा नागरी सत्कार सोहळा समितीकडून सांगण्यात आले.

कासेगाव जि. प. गटात राजकीय दबदबा असलेले व्यक्तिमत्व म्हणून वसंत (नाना) देशमुख यांची ओळख आहे. त्यांच्या चांगल्या कर्तृत्वामुळे कासेगाव ग्रामपंचायत व जिल्हा परिषद गटातील मित्रपरिवार यांच्यावतीने हे आयोजन केले आहे.

गुरुवार दि. १८ रोजी सायं. ५ वा. कासेगाव येथील दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कार्यस्थळावर हा सत्कार सोहळा होणार आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. अध्यक्षस्थानी सरकारी वकील उज्वल निकम आहेत. प्रमुख पाहुणे खा. संजय पाटील, खा. जयसिद्धेश्वर स्वामी, आ. विजयकुमार देशमुख, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, माजी आ. प्रशांत परिचारक, माजी आ. राजन पाटील, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. शहाजी पाटील, आ. समाधान आवताडे, आ. यशवंत माने, राजेंद्र देशमुख, दिलीप माने, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, पुणे महसूल आयुक्त प्रभाकर देशमुख, अमरसिंह देशमुख, शिवाजी सावंत उपस्थित राहणार आहेत.

# माहूरगड येथे राज्यस्तरीय पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा

## पत्रकारांच्या मेळाव्यात विविध मागण्यांचा ऊहापोह

**सुराज्य/अक्कलकोट**

मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणारा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व पत्रकार मेळावा नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड येथे पार पडला.

यावेळी आमदार भीमराव केराम, स्वागताध्यक्ष रामदास सुमठाणकर, फिरोज दोसानी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, किरण नाईक, अध्यक्ष शरद पाबळे, कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, मन्सूर शेख, विजय जोशी, विनोद जगदाळे, शोभा जयपूरकर, संदीप कुलकर्णी, अनिल वाघमारे, प्रकाश कांबळे, गोवर्धन बियाणी, संतोष पांडागळे, सरफराज दोसानी आदी उपस्थित होते. एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांची पेन्शनसह अन्य मागण्यांसाठी करत असलेल्या लढ्याचा उहापोह केला. आमदार भीमराव केराम, विनया देशपांडे, रामदास सुमठाणकर, शरद पाबळे, किरण नाईक, फिरोज दोसानी आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सरफराज दोसानी, सूत्रसंचालन श्रद्धा वरणकर व राम तरटे यांनी केले. आभारप्रदर्शन विजय जोशी यांनी केले. राज्य व विभागीय अधिस्वीकृती समितीवर निवड झालेल्या अध्यक्ष व सदस्यांचा सन्मान यावेळी झाला. त्यात एस. एम. देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, विनोद जगदाळे, शिवराज काटकर, संजय पितळे यांचा समावेश होता. विभागीय समिती अध्यक्ष दीपक कैतके, हरिष पाटणे, विजय जोशी यांचा सन्मान झाला. विभागीय समितीवरील सदस्यपदी निवडीबद्दल विजयसिंह होलम, विनया देशपांडे, अविनाश भांडेकर, चंद्रसेन जाधव यांचा सन्मान यावेळी झाला.

### 'या' जिल्ह्यांना मिळाले पुरस्कार

रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार उत्तरनगर आणि दक्षिणनगर जिल्ह्यांना विभागून देण्यात आला. दक्षिण नगर जिल्ह्याचा पुरस्कार जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके यांनी स्वीकारला. उत्तर नगर जिल्ह्याचा पुरस्कार जिल्हाध्यक्ष अमोल वैद्य यांनी स्वीकारला. वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार माजलगाव, माहूर, साक्री, शिरूर, तेल्हारा, बत्तीस शिराळा, आर्वी, अंबरनाथ या तालुका पत्रकार संघांना त्यांच्या विभागनिहाय देण्यात आले.

### ज्येष्ठ पत्रकारांना जीवनगौरव

याप्रसंगी समर त्रिपाठी, विनायक संतान, कादर दोसानी, गोपाळ कदम, दत्त मोहिते यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



माहुरगड : पत्रकार मेळाव्यात एस. एम. देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

## संक्षिप्त वृत्त

### विठ्ठल कॉर्पोरेशनतर्फे शेतकरी सहल

**कुर्डूवाडी** : राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझर्स लि., जिल्हा कार्यालय सोलापूर व विठ्ठल कॉर्पोरेशन लि. म्हैसगांव तालुका माढा साखर कारखाना यांचे संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण सहल दि.१५ ते दि. १८ पर्यंत (अलिबाग), जिल्हा रायगड येथे एकूण ३१ शेतकरी यांना शेती विषयक अभ्यासासाठी ए.सी. बसने पाठविण्यात आले आहे. या प्रसंगी विठ्ठल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक यशवंत शिंदे, संचालक-प्रविण पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एस. रणवरे, चिफ इंजिनिअर-मोहन पाटील, चिफ केमिस्ट-प्रदीप केदार, मुख्य शेती अधिकारी-महेश चंदनकर, डिस्टीलरी मॅनेजर अनिल शेळके, मुख्य वित्तीय अधिकारी-भास्कर गव्हाणे, परचेस अधिकारी-कल्याण पाटील, प्रशासकीय अधिकारी-प्रदीपकुमार पाटील, एच. आर. मॅनेजर-परमेश्वर माळी, सुरक्षा अधिकारी-सचिन शिंदे यांच्यासह विठ्ठल कॉर्पोरेशन मधील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### जरांगे यांच्या पदयात्रेत सामील होण्यासाठी मंगळवेढ्यात बैठक

**मंगळवेढा** : मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २० जानेवारी रोजी अंतरवाली सराटी येथून पायी पदयात्रा मुंबईकडे निघणार आहे. यासंदर्भात मंगळवेढा येथे बैठक पार पडली या बैठकीमध्ये मंगळवेढा तालुक्यातील २५ हजार मराठा बांधव या यात्रेमध्ये सहभागी होणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीला माऊली पवार ,राजन जाधव ,गणेश देशमुख ,महेश पवार आदींनी मार्गदर्शन केले. सदर मोर्च्याच्या नियोजनासाठी मंगळवेढा तालुक्यामधील प्रत्येक गावामध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने बैठकांचे आयोजन केलेले आहे. सदर मोहीम भरपूर दिवस चालणार असल्यामुळे जे सहभागी होणार आहेत त्यांनी आपली स्वतःची खाण्याची राहण्यासाठी लागणारे साहित्य सोबत घ्यायचे आहे. या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आली.

### सोशलच्या सय्यद इनामदारचे ऑलिम्पियाड परीक्षेत यश



**सोलापूर** : सायन्स ऑलिम्पियाड फाऊंडेशन गुडगाव आयोजित आंतरराष्ट्रीय इंग्रजी-ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत सोशल उर्दू हायस्कूल इयत्ता आठवीत शिकत असलेला सय्यद हस्सान सय्यद गुफ्रान इनामदार याने शाळेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. त्याने इंटरनॅशनलमध्ये ३७४५, रिजनलमध्ये २५०४, झोनलमध्ये १८२० ही रँक मिळवली आहे. त्याला शाळेमध्ये दुसरा रँक मिळाला आहे. या परीक्षेत एकूण ८० विद्यार्थी सहभागी झाले होते. या यशाबद्दल त्याचे आजोबा सय्यद इरफान, चुलते सय्यद इम्रान यांनी अभिनंदन केले.



**जि प जरगवस्ती शाळेच्या अध्यक्षपदी निवडीनंतर महेश पाटील व , उपाध्यक्षपदी अमृता सातपुते यांची निवड झाली.**

### जरगवस्ती शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी पाटील

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जरगवस्ती जि प प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी महेश पाटील यांची बिनविरोध निवड झाली.उपाध्यक्षपदी अमृता सातपुते यांची बिनविरोध निवड झाली. शिक्षणतज्ञ म्हणून सुनिल खुर्द , सदस्यपदी प्रशांत सातपुते, चंद्रकांत भैस, शिवदास करडे, रेश्मा पाटील, संजिवनी खुर्द, उज्वला जाधव, शर्मिला डाके, सचिवपदी मुख्याध्यापक सोमनाथ बुगड यांच्या बिनविरोध निवडी झाल्या. करणयात निवडीवेळी अध्यक्षपदी वामन पाटील होते. सुर्यकांत खुर्द, नीलम सातपुते, विकास गलांडे, प्रमोद पाटील, वनिता खुर्द, काजल खुर्द, वनिता जरग, शालन खुर्द, छाया माळी आदी उपस्थित होते. निवडीनंतर माजी अध्यक्ष सुर्यकांत खुर्द यांच्या हस्ते नुतन अध्यक्ष महेश पाटील, उपाध्यक्ष व इतर सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

### चंद्रप्रभु इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**पिलीव** : नातेपुते येथील चंद्रप्रभु इंग्लिश स्कूलच्या वार्षीक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन नुकतेचे झाले. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून उर्जा फाऊंडेशनच्या अध्यक्षा संस्कृती सातपुते या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमहेंद्र दोशी होते. यावेळी बालचमुंनी विविधरंगी वेशभूषा परिधान करुन वेगवेगळ्या गाण्यांवर तालबद्ध नृत्य व ऐतिहासिक प्रसंग सादर केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती, सावित्रीबाई फुले, वर्धमान महावीर, राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमांचे पुजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक शीतल ढापे यांनी केले. कार्यक्रमास 'चंद्रप्रभु'चे चेअरमन नरेंद्र गांधी, सचिव विरेंद्र दावडा, व्हा. चेअरमन वर्धमान दोशी, बाहुबली चंकेश्वरा, अतुल पाटील, माऊली पाटील, संजय गांधी, मनीष दोशी, रेवती चंकेश्वरा, सुप्रिया पाटील, गौरी पाटील, सारिका गांधी,वर्षा दावडा,अर्चना गांधी,निलीमा गांधी,मुख्याध्यापक शीतल ढापे यांच्यासह विदयार्थी, पालक उपस्थित होते.

# पंढरपूर नगर परिषदेच्या कामगारांना विमा योजनेचा लाभ

## मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांची माहिती

सुराज्य/पंढरपूर

सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान दर्जा उंचावण्याचे दृष्टीने नगरपरिषदेच्या वतीने कर्मचाऱ्यांचा पोस्टल विभागाकडे ३९६ रुपये भरून दहा लाखांचा विमा उतरवण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी दिली.

कॅम्प फाउंडेशन पुणे, यांच्यावतीने नगरपालिका सभागृहात याचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. पंढरपूर शहरामध्ये वर्षातून चार मोठया यात्रा व इतर वेळी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. शहर स्वच्छतेचे काम नगर परिषदेचे सर्व सफाई कर्मचारी अतिशय प्रामाणिकपणे करतात, परंतु स्वच्छतेचे काम करत असताना काळजी घेणे ही आवश्यक आहे, असे जाधव यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी यांची बैठक घेऊ नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या व सफाई कर्मचाऱ्यांना विमा आयुष्मान भारत व आरोग्य शिबिर यासारख्या योजना राबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पंढरपूर नगरपरिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे दोन दिवसांचे क्षमता व बांधणी प्रशिक्षण शिबिर नुकतेच पार पडले. सफाई कर्मचाऱ्यांचे काम व घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन करण्यात आले.

अॅड. सुनील वाळूजकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, कॅम्प फाउंडेशन पुणेच्या संचालिका डॉ. नीतू सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

**कर्मचाऱ्यांचा मोठा प्रतिसाद**

कर्मचा–यांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती यावी म्हणून या शिबिरात सफाई कर्मचा–यांचे दररोजचे काम व घ्यावयाची काळजी, सफाई कामातील जोखीम व त्याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती या शिबिरात देण्यात आली. त्याला कर्मचाऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.



**पंढरपुरमध्ये सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छता करताना घ्यावयाची काळजी व सुरक्षा साधनांची माहिती प्रात्यक्षिकांद्वारे देण्यात आली.**

# 'सहकार महर्षि' मध्ये साखर पोत्याचे पूजन

## आतापर्यंत ५ लाख २५ हजार ५२५ पोती साखरेचे उत्पादन

सुराज्य/अकलूज

येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या २०२३-२०२४ च्या गळीत हंगामामध्ये उत्पादित ५ लाख २५ हजार ५२५ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्याहस्ते झाले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे, असे कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी सांगितले. यंदा १४ जानेवारी अखेर ५ लाख ९३ हजार ३०९ टन ऊसाचे गाळप होऊन ५ लाख ३२ हजार ७०० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. साखर उतारा बी-हेवी सह १०.६१% आहे. सध्या प्रति दिवस ८ हजार टन ऊसाचे गाळप होत आहे.

को-जन वीज निर्मिती प्रकल्पात ४ कोटी ६१ लाख ६९ हजार ८०० युनीट वीज निर्माण झाली आहे. २ कोटी ७१ लाख ७३ हजार ३२१ युनिट विक्री झाली. डिस्टीलरीमध्ये बी-हेवी पासून ८२ लाख ०७ हजार १८७ लिटर रेक्टीफाईड स्पिरीट, ७५ लाख १५ हजार ६२१ लिटर इथेनॉल उत्पादन झाले आहे. तसेच २५९.५०० टन अॅसिटाल्डीहाईड व २८७.८०० टन अॅसिटीक अॅसिडची निर्मिती झाल्याचेही चौगुले म्हणाले.

कारखान्याचे संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, भिम काळे, अमरदिप काळकुटे, सुभाष कटके, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक प्रकाश पाटील, रामचंद्र सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, विनायक केचे, राजेंद्र भोसले, अमृतराज माने-देशमुख, धनंजय सावंत, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, हर्षाली निंबाळकर, विजय माने-देशमुख, शिवाजी सिद, भारत फुले, सुनिल एकतपुरे, मोहन लोंढे, केशव ताटे, किसन वाघ, नितीन निंबाळकर संचालिका कमल जोरवर आदी उपस्थित होते.




**सहकारमहर्षि कारखान्यातील साखर पोत्याचे पूजन कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते–पाटील यांच्याहस्ते झाले. यावेळी लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे आदी.**

# कुर्डूवाडीत सांब महाराज पुण्यतिथी साजरी

सुराज्य/कुर्डूवाडी


तपो निधी श्री सांब शिव योगेश्वर महाराज यांची ८३ वी पुण्यतिथी कुर्डूवाडीत सोमवार दि.१५ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.




तपो निधी श्री सांब शिव योगेश्वर महाराज यांच्या जागृत समाधीचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्र कर्नाटक आंध्र प्रदेश हैदराबाद बेंगलोर गुलबर्गा बिदर बसवकल्याण कमला नगर करहरी सोलापूर लातूर निटूर निलंगा बार्शी पंढरपूर उमरगा पुणे उदगीर नांदेड भागातून भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवार दि.१५ जानेवारी वार सोमवार रोजी पहाटे ५ वाजता श्रींच्या समाधीस पंचांच्या वतीने रुद्राभिषेक व आरती , सकाळी ९ वाजता श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न द्वितीय सांब शिव योगेश्वर महाराज यांच्या हस्ते श्रींच्या समाधीस रुद्राभिषेक व महाआरती नंतर. दुपारी १२-०५ वाजता श्रींच्या समाधीवर पुष्प वृष्टी करण्यात आली. श्रींची शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य ,वीरभद्र ,श्रींच्या पालखी सह श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न द्वितीय सांब शिव योगेश्वर महाराज यांच्या दिव्य सानिध्यात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मंदिरात आल्यानंतर महाआरती होऊन श्री सांब स्वामी महाराजांच्या समाधीला नैव्यद्य अर्पण केल्यानंतर उपस्थित भावीक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी शहरातील वीरशैव समाजातील आबालवृद्धांनी परिश्रम घेतले.

# पक्षकाम जोमाने करणाऱ्यांनाच संधी द्या : चवरे



**मोहोळ येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत शिंदे सेनेच्या नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.**

सुराज्य/मोहोळ

पक्षाचे काम जोमाने करा काम करणारांना संधी द्या आपल्या कार्यकर्त्यावर अन्याय होणार नाही याचीही काळजी पदाधीकाऱ्यांनी घेवून काम करणारांना संधी द्यावी व आपल्या भागात जास्तीत जास्त निधी मिळवून विकास कामे चांगल्या पद्धतीने करावीत असा सल्ला शिंदे सेनेचे जिल्हा अध्यक्ष चरण चवरे यांनी दिला

मोहोळ येथील शासकिय विश्रामगृहात आयोजित केलेल्या तालुक्यातील कार्य कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते याप्रसंगी शिवसेना संपर्क नेते दादासाहेब पवार तालुका प्रमुख सचिन सुरवशे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपजिल्हा प्रमुख दादासाहेब करणावर, विधानसभा अध्यक्ष संजय सरवळे, नरखेड जि.प. उपतालुका प्रमुख समाधान खंदारे , आष्टी उपतालुकाप्रमुख संभाजीराजे बंडलकर, कामती किरण वाघमोडे, कुरुल प्रमोद लांडे, पेनूर बालाजी गव्हाणे, नरखेड विभाग प्रमुख विलास ढेरे, आष्टी विभाग प्रमुख पोपट शिंदे, कामती अमोल पाटील, दादाराव वाघमोडे, सुहाज जगताप यांच्या निवडी करण्यात आल्या

यावेळी अंकुश कदम, ढोकबाभूळगावचे सरपंच शिवाजी पासले,शिवसेना शहर प्रमुख सिकंदर धोत्रे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कल्पना स्वामी,महिला आघाडी शिवसेना शहर प्रमुख मुक्ता खंदारे, महिला आघाडी शिवसेना उपतालुका प्रमुख जस्मिन पठाण, जमीर मुजावर, आनंद भोसले, साईनाथ लोमटे, बाळासाहेब नाईकनवरे, आप्पासाहेब बिराजदार आदीसह पदाधीकारी उपस्थित होते. याप्रसंगी नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



**कोंडी येथे मराठा युवक व संभाजी बिग्रेड च्या कार्यकर्त्यांनी विकसित रथ यात्रेला विरोध करत निर्दशने केली. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.**

# उत्तर तालुक्यात विकसित रथ यात्रेला विरोध

सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी, अकोलेकाठी, बीबी दारफळ, कौटाळी इतर गावात संभाजी बिग्रेड, मराठा समाजातील युवक व शेतकऱ्यांनी विविध कारणास्तव पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या विकसित भारत रथ यात्रेचा कडकडून विरोध केला आहे.

कोंडी येथे मराठा युवक व संभाजी बिग्रेड च्या कार्यकर्त्यांनी विकसित रथ यात्रेला विरोध करत निर्दशने केली व पोस्टर फाडली,अकोलेकाठी येथे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालास बाजार भाव मिळत नाही,कोणत्याही योजना ह्या शासनाच्या असून पंतप्रधान हे योजनेच्या माध्यमातून मोदी स्वतःचे नावाची प्रसिद्ध करत आहेत.कांदा व इतर पिकास हमी भाव मिळावा,प्रत्येक योजना घर पर्यंत पोहचत नाही पण प्रसिद्धी केली जाते. जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही,तोपर्यंत सर्व प्रकारच्या योजना यापुढे मोदी म्हणून योजना आणल्यास, जाहिरात व प्रसिद्धी केल्यास त्या सर्व योजनांवर बंदी घालू असे संभाजी बिग्रेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत यांनी म्हटले आहे. विविध मागण्या बोगस प्रसिद्धी व इतर अनेक कारणाने उत्तर तालुक्यातील अनेक गावांत विकसित रथ यात्रा हुसकाऊन लावण्यात आल्या आहेत.

# मोहोळ तालुक्याच्या विकासासाठी स्थानिक आमदारच असला पाहिजे

## मोहोळचे नगराध्यक्ष रमेश बारस्कर यांचे मत

सुराज्य/विरवडे बु

मोहोळ तालुक्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर सर्वांनी मिळून मोहोळचा स्थानिक आमदार करणे गरजेचे आहे, असे मत मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर यांनी मांडले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी रोशन मंगल कार्यालय कामती बु. (ता.मोहोळ) या ठिकाणी झाल्या. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे लीगल सेलचे प्रदेश चिटणीस अॅड. पवनकुमार गायकवाड, व मोहोळ तालुका युवक अध्यक्ष अॅड. विठोबा पुजारी, यांच्याहस्ते पत्र देऊन युवा आघाडीच्या निवडी घोषित करण्यात आल्या आहेत.

यावेळी अॅड. पवनकुमार गायकवाड यांनी सर्व युवकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रवादीच्या सर्व कार्यकर्त्यांना एका नवीन ऊर्जेने पुन्हा एक नव्याने इतिहास घडवण्याची ही वेळ आहे. युवकांनी संघटित होऊन पक्ष बांधणी करावी. युवकांच्या पाठीशी आम्ही सर्व वकिल कायमस्वरूपी पाठीशी राहू. येणाऱ्या विधानसभेमध्ये मोहोळ तालुक्याचा शरद पवार यांच्या विचारांना मानणारा आमदार निवडून आणू, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे रमेश बारस्कर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष अतुल क्षीरसागर,विधानसभा कार्याध्यक्ष मंगेश पांढरे, युवक अध्यक्ष तनवीर शेख, कार्याध्यक्ष आबासाहेब कांबळे,जितेंद्र अष्टूळ,संतोष सोलंकर,अतुल घुले तालुका उपाध्यक्ष, अंगद ओहळ सुग्रीव ओहळ यांच्यासह कामती व परिसरातील तरुण वर्ग व शरद पवार गटाचे नेते मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होता. कार्यक्रमाचे आयोजन ऋषी गायकवाड व समर्थ खराडे यांनी केले होते.




**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी कामती येथे पार पडल्या. याप्रसंगी अॅड. पवनकुमार गायकवाड, अॅड. विठोबा पुजारी आदी.**



# सातही नंदीध्वजांना सिद्धेश्वर तलावात घालण्यात आले करमुटगी स्नान

## 'हर्र बोला हर्र' च्या जयघोषात नंदीध्वजांना गंगास्नान; भाविकांची मोठी गर्दी

✔ सुराज्य/सोलापूर

सोमवारी संबळच्या निनादात..हर्र बोला हर्र च्या जयघोषात मानाच्या सातही नंदीध्वजांना हळद लावून करमुटगी स्नान घालून हळद काढण्यात आली. दरम्यान, अमृतलिंगाची पूजा करून गंगापूजन करण्याचा धार्मिक विधी सोमवारी पार पडला. याचवेळी हळद आणि तेलाच्या मिश्रणाने श्री सिद्धेश्वरांची मूर्ती, योगदंडास स्नान घालण्यात आले. यावेळी मंदिर परिसरातील वातावरण अतिशय भक्तीमय झाले होते.

ग्रामदैवत श्री. सिद्धरामेश्वर यात्रेतील तैलाभिषेक व अक्षता सोहळा या दोन धार्मिक विधींनंतर सोमवारी नंदीध्वजांना करमुटगी स्नान सोहळा सकाळच्या सत्रात उत्साही वातावरणात पार पडला. परंपरेप्रमाणे सकाळी नऊ वाजता हिरेहब्बू वाड्यात मानकऱ्यांच्या हस्ते नंदीध्वजांचे पूजन झाले. संबळ आणि हलग्यांच्या निनादात मिरवणुकीने सातही नंदीध्वज संमती कट्ट्याजवळ आले. प्रथम श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या योगदंडास हळद व तेलाचा लेप लावून करमुटगी स्नान घालण्यात आले. त्यानंतर पालखीतील उत्सव मूर्तीस करमुटगी स्नान घातले. त्यापाठोपाठ सातही नंदीध्वजांना तलावात एकाच वेळी करमुटगी स्नान घालण्यात आले. पहिल्या व दुसऱ्या नंदीध्वजांचे मानकरी हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते अमृत लिंगाजवळ गंगापूजन करण्यात आले. देशमुखांना हिरेहब्बूंकडून विडा देण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमानंतर मानाचे नंदीध्वज हिरेहब्बू वाड्याकडे मार्गस्थ होतात.





# सिद्धेश्वर यात्रेचा होम प्रदीपन सोहळा उत्साहात

✔ **सोलापूर** : ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेतील तिसऱ्या दिवशी होम मैदानावर मंगलमय वातावरणात कुंभार कन्येच्या प्रतिकृती अग्नी देताच भाविकांनी एकदा फक्त लिंग हर्र बोला हर्र जयघोष केला. उत्तर कसब्यातील हिरेहब्बू यांच्या वाड्यात योगदंडाला नागफणा बांधण्यात आला. नागफणा नंदिध्वज व दुसऱ्या नदी ध्वजाची पूजा झाली.

त्यानंतर बग्गी मध्ये हिरेहब्बू व पाठीमागे पालखीसह पोलिसांचा मोठा बंदोबस्त मिरवणूक होम मैदानाकडे मार्गस्थ झाली. उत्तर कसबा, दक्षिण कसबा, दाते गणपती बोळ, दत्त चौक, माणिक चौक, विजापूर वेस, पंचकट्टा मार्गी होम मैदानावर गेल्यानंतर होम प्रदीपन सोहळा सुरु झाला. राजशेखर हिरेहब्बू यांनी होमकुंडात उतरले. त्या होमकुंडात बाजरीच्या पेंडीचे तयार केलेले कुंभार कन्येस शालू नेसून सौभाग्य अलंकार घालून त्या कुंभार गणेश, मणी मंगळसूत्र, बांगड्या, जोडवे, हार दांडा घालून त्या कुंभार कन्येस सजवले. त्यानंतर त्यांची पूजा केली.



त्या कुंभार कन्यास अग्नी दिले. त्यानंतर येथील विडा कुंभार यांना दिला. त्यानंतर हिरेहब्बू व पालखी पाच प्रदक्षिणा घातले.




# पत्रकारांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लावणार

## आ.समाधान आवताडे यांचे प्रतिपादन; पंढरपूर येथे पत्रकारांचा सन्मान

✔ सुराज्य/पंढरपूर

पत्रकार हा समाजाबरोबरच लोकप्रतिनिधींचा आरसा असतो. पंढरपूर येथील पत्रकारांच्या घरकुलाचा प्रश्न सातत्याने मांडला जात आहे. लवकर बैठक घेऊन हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचा विश्वास पत्रकारांना आ. समाधान आवताडे यांनी दिला.

आ. समाधान आवताडे यांच्यावतीने पंढरपूर येथील पत्रकारांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन येथील पत्रकार भवन येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विलास उत्पात हे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विजयसिंह देशमुख, सुनिल डोंबे, तुकाराम कुरे, विनोद लटके, समाधान घायाळ, प्रसाद कळसे उपस्थित होते.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. यातून दर्जेदार कामे कशी करता येतील याकडे लक्ष घालणार असल्याचे अवताडे यांनी सांगितले. यावेळी पत्रकारांनी पंढरपुरातील विविध विकास कामांबाबत तसेच विठ्ठल मंदिराच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केला. यावर आमदार आवताडे यांनी आपण यामध्ये लक्ष घालणार असल्याचा विश्वास दिला. मंदिर समितीवर पत्रकार प्रतिनिधी नेमण्यासाठी प्रयत्न मंदिर समितीवर सदस्य म्हणून पत्रकार प्रतिनिधी घ्यावा, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आवर्जून सांगितले. सुरुवातीला आमदार आवताडे यांनी पत्रकार दिनाच्या व मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर पत्रकारांचा सन्मान करून पेन, शाल आणि पंढरपूरचे पत्रकार श्रीकांत साबळे यांनी लिहिलेले संघर्षयात्री हे पुस्तक भेट दिले.

# बार्शी तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेस प्रतिसाद

# तब्बल २२५ पैलवानांच्या रांगड्या खेळाचे दर्शन



✔ सुराज्य/बार्शी

नमो चषक भव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत येथील श्रीमान बाबासाहेब उध्दवराव मनगिरे व्यायाम शाळा, रणवीर व्यायाम शाळा व भाजपा बार्शी शहर व तालुका यांच्या संयुक्त विदयमाने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा झाल्या. स्पर्धेत १६ वर्षाखालील व १९ वर्षाखालील मुले व मुली अशा एकूण २२५ पैलवानांनी यात सहभाग नोंदवला.

स्पर्धेत ३५ किलो पासून ९५ किलो वजनगटातील मल्लांनी सहभाग घेतला. वीरशैव लिंगायत बोर्डिंग येथे झालेल्या स्पर्धेचे उदघाटन बब्रुवाहन बारबोले यांच्याहस्ते व महादेव बारंगुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. व्यासपीठावर बाजार समितीचे संचालक रावसाहेब मनगिरे, विजय राऊत, सभापती रणवीर राऊत, रामेश्वर मांजरे, राजा घोलप, नाना सातपुते, दिपक राऊत, भारत पवार, शरद फुरडे, संदेश काकडे, तात्या पडवळ, गणेश डमरे, दिपक सुरवसे, गिरीष बरिदे आदी उपस्थित होते. श्री हनुमान व आखाडा पूजन होवून कुस्तीला प्रारंभ झाला. प्रारंभी लहान मल्लांच्या व नंतर मोठया मल्लांच्या कुस्त्या झाल्या. प्रत्येक वजनगटातील प्रथम व द्वितीय क्रमांकास बक्षीस देण्यात आले. १६ वर्षाखालील मुले व मुली यांना प्रथम क्रमांकास ७०० रूपये व सन्मानचिन्ह तर द्वितीय क्रमांकास ५०० रूपये व सन्मानचिन्ह, तर १९ वर्षाखालील मुले व मुली यांना प्रथम क्रमांकास रोख १५०० रूपये व सन्मानचिन्ह तर द्वितीय क्रमांकास १००० रूपये व सन्मानचिन्ह असे बक्षीस देवून विजेत्यांना गौरविण्यात आले. प्रमोद माळी, अविनाश वडतिले, मोहसीन यांनी पंच म्हणून काम पाहिले. पवार, कोळी, होनमुटे सर, माने आदींनी परिश्रम घेतले.

**विजेते पुढीलप्रमाणे :** १६ वर्षाखालील मुले : वजन गट ३५ किलो : १) समर्थ गुंजाळ (वैराग), २) अनिकेत शिंदे (मालेगांव), वजन गट ४० किलो : १) समर्थ विटकर (मालेगांव), २) अंगद घोडके (वैराग), वजन गट ४५ किलो : १) तुषार वाघमारे (बार्शी), २) प्रसाद धस (बार्शी), वजन गट ५० किलो : १) बाळासाहेब दळवी (खांडवी), २) आसफ मुजावर (आगळगांव), वजन गट ५५ किलो : १) ओम यादव (खांडवी), २)ओम धस (पिंपळगांव धस), वजन गट ६० किलो : १) धवलकुमार बारंगुळे (शेलगांव मा), २) कैवल्य बारंगुळे (बार्शी), वजनगट ६५ किलो : १) यशराज कसबे (पिंपळगांव धस), २) यशराज साळुंके (बार्शी), वजनगट ७० किलो : १)गणेश पांढरमिसे (घाणेगांव)

१९ वर्षे वयोगट : वजन गट ५५ किलो : १)सागर खराडे बार्शी, २) ओम नलगे, वैराग, वजन गट ६० किलो :१) समाधान शिंदे, लोणी, २) कांतिलाल बारंगुळे, बार्शी, वजन गट ६५ किलो : १)सोमनाथ शिंदे बार्शी, २) सोहम चौरे बार्शी, वजन गट ७० किलो : १)अनिकेत शिंदे घाणेगांव, २)साहिल शेख बार्शी, वजन गट ७५ किलो : १)अतुल ढगे घाणेगांव, २) संदेश भाकरे बार्शी, वजन गट ८० किलो : १) निलेश जमदाडे पानगांव, २) राजा आगलावे बावी, वजन गट ९० किलो : १) अमृत गव्हाणे खांडवी, २) कृष्णा ताकभाते वैराग, वजन गट ९५ किलो : १)विष्णू जाधव मालेगांव, २) विश्वजीतसिंह घाडगे बार्शी

मुली : वजन गट ३५ किलो : १)जयजम्मा चौगुले बार्शी, वजन गट ५५ किलो : १)श्रेया दांगट बार्शी.

# सहकारमहर्षी गणपतराव साठे जयंतीनिमित्त माढा महोत्सव

## आजपासून भव्य शोभा यात्रेसह विविध कार्यक्रम

✔ सुराज्य/माढा

**जिल्ह्याचे पहिले सहकारमहर्षी गणपतराव धोंडीबा साठे यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त माढा महोत्सव २०२४ आयोजित केला आहे. माढा शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे कूर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांनी सांगितले.**



सहकार महर्षी गणपतराव साठे प्रतिष्ठान, क्रांती साठे क्रीडा व बहुउद्देशीय मंडळ प्रियदर्शिनी महिला मंडळ, श्री संत कूर्मदास पतसंस्था आयोजित या महोत्सवांतर्गत मंगळवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता सहकारमहर्षींच्या प्रतिमेच्या पूजन करून भव्य आशा शोभायात्रेची सुरुवात सहकार महर्षी गणपतराव साठे जि. प. प्रशाला येथून होणार आहे. शोभायात्रेच्या माध्यमातून शहर आणि परिसरातील विद्यार्थी विविध वेशभूषा च्या माध्यमातून सामाजिक संदेश देणार आहेत. यामध्ये लोप पावत चाललेल्या लेझीम, मर्दानी खेळ, झांज पथक, लघुनाट्य सारखे उपक्रम दाखवले जाणार आहेत. बुधवार दि. १७ जानेवारी सायंकाळी सात वाजता जि.प. प्रशाला येथे विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध शाळा कॉलेजमध्ये घेण्यात आलेल्या निबंध, वक्तृत्व, रांगोळी, रंगभरण, क्रिकेट आदी स्पर्धांचे पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. रविवार दि.२१ जानेवारी रोजी माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामधून राज्यस्तरीय मॅरेथॉनचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा सहकार महर्षींनी सुरू केलेला सहकार टिकावा वाढवा या उद्देशाने 'रन फॉर को-ऑपरेटिव्ह मोमेंट'. या स्लोगनद्वारे आयोजित केली आहे.

यामध्ये खुल्या गटातून पुरुष व महिलांसाठी तसेच शालेय मुला-मुलींसाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. निशुल्क प्रवेश देण्यात येणार असून विजेत्या स्पर्धकांना चांगल्या स्वरूपात बक्षीस आणि स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्राचे दिले जाणार आहे. सहकार महर्षी गणपतराव साठे यांनी तत्कालीन काळात सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण व्हावा यासाठी सुरू केलेल्या शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांमधून सर्जनशील आणि स्वाभिमानी भावी नागरिक घडावेत हा उद्देश ठेवून हे आयोजन करत आहे, असेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेस क्रांती साठे क्रीडा मंडळाचे अध्यक्ष उमेश साठे, पाणीपुरवठा समितीचे सभापती नितीन साठे, नगरसेवक नितीन साठे, विजय साठे, वेदांत साठे, हनुमंत राऊत, लक्ष्मण राऊत, सोमनाथ शिंदे , गणेश जोशी, किरण जाधव, प्रवीण घाडगे, कृष्णा राऊत, प्रकाश जाधव, धनाजी वसेकर आदीं उपस्थित होते.

